रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक २८४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, बुधवार, दि. २० मार्च २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹




उन्हाळ्याची सुट्टी
AI शी गट्टी
चला करूया MS-CIT!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

### ६० हजारांहून अधिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात
# ‘उमटे’चे पाणी शेवाळमिश्रीत

प्रमोद जाधव
| अलिबाग |

**अलिबाग तालुक्यातील उमटे धरणातील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. धरणाने तळ गाठण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे धरणातून शेवाळमिश्रित पाणीपुरवठा होत आहे. हजारो नागरिक दूषित पाणी पीत असल्याने जलजन्य आजार होण्याची भीती निर्माण झाली आहे. रायगड जिल्हा परिषद ६० हजारांहून अधिक नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याचे बोलले जात आहे.**

अलिबाग तालुक्यातील रामराज विभागातील बोरघर ग्रामपंचायत हद्दीमध्ये १९७८-७९ या कालावधीत उमटे धरण बांधण्यात आले. ४५हून पान २ वर

## आता दोन दिवस आड पाणीपुरवठा

धरणांतील पाण्याची पातळी कमी झाली आहे. पावसाळा सुरु होईपर्यंत धरणातील पाण्याचा पुरवठा करणे गरजेचे आहे. त्यानुसार अलिबाग पंचायत समिती ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून पाणीकपातीला सुरुवात करण्यात आली आहे. एक एप्रिलपासून दर दोन दिवस आड पाणीपुरवठा केला जाणार आहे. नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन उपअभियंता चवरकर यांनी केले आहे.



उमटे धरणात ४३ मीटरपर्यंत पाण्याची पातळी आहे. धरणातील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. शेवाळमिश्रित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. त्यावर पर्याय म्हणून पाण्याची तपासणी करून जलशुद्धीकरणासाठी टीसीएल पावडरचा वापर करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.
– नेहाल चवरकर, उपअभियंता,
अलिबाग पंचायत समिती, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग



उमटे धरण आणि त्यातील शेवाळ, मातीमिश्रित पाणी हे दरवर्षीचे दुखणे आहे. रा.जि. परिषदेच्या क्षेत्रात हे धरण आहे. धरणामध्ये पुरेसा पाण्याचा साठा नसताना धरणाच्या बाहेर पाईपलाईन टाकायला कोट्यवधींचा निधी उपलब्ध होतो; पण, धरणातील ‘गाळ’ काढण्यासाठी नाही, ही मोठी शोकांतिका आहे. खरं तर, पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केल्याशिवाय आम्हाला शुद्ध आणि मुबलक पाणी मिळणार नाही.
– ॲड. राकेश नारायण पाटील

# अलिबागची पाणी योजना लालफितीत

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग शहराला वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. गेल्या दीड महिन्यांपासून हा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे. हा प्रस्ताव अद्याप मंजूर करण्यात आला नाही. त्यामुळे अलिबागमधील पाण्याची योजना लालफितीत अडकल्याचे समोर येत आहे.

अलिबाग शहर पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असून, शहरात वेगवेगळी शासकीय कार्यालये आहेत. शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असल्याने पाण्याची मागणीदेखील वाढू लागली आहे. भविष्यात पाण्याची समस्या निर्माण होऊ नये यासाठी नगरोत्थान योजनेंतर्गत अलिबाग शहराला वाढीव पाणीपुरवठा व वितरण केले जाणार आहे. पुढील तीस वर्षांच्या मागणीनुसार हा प्रस्ताव अलिबाग नगरपरिषदेने शासनाला दीड ते दोन महिन्यांपूर्वीच पाठविला



- **दीड महिन्यांपासून प्रस्ताव प्रलंबित**
- **नागरिकांना योजनेची प्रतीक्षा**

आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता मिळाली आहे. हा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. मात्र, अजूनपर्यंत या प्रस्तावाला विभागाकडून मंजुरी देण्यात आली नाही. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे हा प्रस्ताव आता मंजुरीसाठी लांबणीवर गेल्याने पान २ वर

## आजचा अग्रलेख
### कुडमुड्यांचा चेहरा

## वेधक

### प्रदीप शर्मांना जन्मठेप

**मुंबई :** एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्यावरील आरोप सिद्ध झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने प्रदीप शर्मा यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. २००६ च्या लखन भैया एन्काऊंटर प्रकरणाशी संबंधित अनेक याचिकांवर न्यायालयाने मंगळवारी निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठाने ८ नोव्हेंबर २०२३ रोजी या २००६ मध्ये दाखल केलेल्या १६ अपिलांच्या सुनावणीवर निकाल राखून ठेवला होता. २००६ मध्ये झालेल्या लखन भैय्या एन्काऊंटरची चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर ती चकमक बनावट असल्याचं एसआयटी चौकशीत उघड झालं.

### रामदेवबाबा हाजिर हो!

**नवी दिल्ली :** ॲलोपॅथी औषधं प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने योगगुरू रामदेवबाबा यांना दणका दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने रामदेव बाबा आणि बालकृष्ण यांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने रामदेव बाबा यांना फटकारले आहे. रामदेव बाबा आणि बालकृष्ण यांनी प्रथमदर्शनी कायद्याचे उल्लंघन केले आहे. यामुळे न्यायालयाच्या अवमाननेनुसार कारवाई का करू नये? असा प्रश्न करत सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे.

### चार नक्षलवाद्यांना घातले कंठस्नान

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घातपाताचा डाव पोलिसांच्या सी ६० जवानांच्या पथकांनी हाणून पाडला. पोलीस जवानांनी चार जहाल नक्षलवाद्यांना कंठस्नान घातलं आहे. गडचिरोलीच्या जंगलात मंगळवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास ही मोहीम पोलीस जवानांनी फत्ते केली. हे जहाल नक्षलवादी तेलंगणा राज्यातून प्राणहिता नदी ओलांडून घातपात घडवण्यासाठी महाराष्ट्रात दाखल झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, चार नक्षलवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. त्यानंतर सी-६० पथकानं जोरदार प्रत्युत्तर दिलं. गोळीबार थांबल्यानंतर आणि परिसराची झडती घेतल्यानंतर चार जहाल नक्षलवाद्यांचे मृतदेह पोलीस जवानांना सापडले.

# ‘घड्याळ’ वापरा, पण अट पाळा

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवार गट आणि अजित पवार गटासाठी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. १९) महत्त्वपूर्ण आदेश दिला. शरद पवार गटाला तुतारी चिन्ह कायम ठेवण्यात आले असून, हे चिन्ह अन्य कोणालाही दिले जाणार नाही. तसेच अजित पवार गट हा घड्याळ चिन्ह वापरु शकतात. मात्र, त्याखाली न्यायालयातील प्रलंबित आव्हानाच्या निकालाच्या अधीन असे लिहिणे बंधनकारक आहे, अशी अट घालण्यात आली आहे.

मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीवेळी शरद पवार गटाने घड्याळ चिन्ह कोणालाही देऊ नये, अशी मागणी केली.



**अजित पवार गटाला ‘सर्वोच्च’ निर्देश**

यावर न्यायालयाने स्पष्ट केले की, याबाबतचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला आहे. त्यामुळे आता आम्हाला यामध्ये हस्तक्षेप करता येणार नाही. मात्र, अजित पवार गटाने प्रचाराच्या सर्व जाहिरातींवर त्यांना दिलेले घड्याळ चिन्ह हे खरे राष्ट्रवादी याबाबत प्रलंबित आव्हान याचिकांच्या निकालाच्या अधीन आहे, असे लिहिणे बंधनकारक असल्याचे आदेश न्यायालयाने दिले आहे.

## शरद पवार गटाला दिलासा

**सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाला मोठा दिलासा दिला आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शरद पवार गट निवडणूक चिन्ह म्हणून ’तुतारी वाजवणारा माणूस’चा वापर करू शकतो. याआधी जेव्हा निवडणूक आयोगाने पवार गटाला हे चिन्ह दिले होते, तेव्हा त्याचा वापर राज्यसभा निवडणुकीपूरता वापर करण्याचे आदेश होते. आता मात्र शरद पवार गटाला हे चिन्ह लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतदेखील वापरता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार गटाला दिलासा देत असताना निवडणूक आयोगाला देखील स्पष्ट आदेश दिले आहेत.**

## विजेच्या धक्क्याने वायरमनचा मृत्यू

| अलिबाग | प्रतिनिधी |

विद्युत खांबावर चढून काम करत असताना कर्मचाऱ्याला विजेचा धक्का बसला. त्यात त्याचा अपघाती मृत्यू झाला. ही घटना विद्यानगर येथील सिगल सोसायटीजवळ घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सूरज मिसाळ असे या वायरमनचे नाव असून, तो सुतारपाडा येथील रहिवासी आहे. विद्युत खांबावर चढून तो व त्याचा सहकारी मंगळवारी सायंकाळी काम करीत होता. यावेळी अचानक दोघांना विजेचा झटका बसला. त्यामध्ये सूरजला गंभीर दुखापत झाल्याने तो जागेवरच मृत पावल्याची माहिती अलिबाग पोलिसांनी दिली. या घटनेत सूरजचा सहकारी सुदैवाने बचावला.

# आता बँक व्यवहारांवरही नजर
## बँकांनी संशयास्पद व्यवहारांची माहिती द्यावी : जावळे

| रायगड | खास प्रतिनिधी |

जिल्ह्यातील बँकांकडून होणाऱ्या व्यवहारांची माहिती निवडणूक आयोगाकडे सादर करण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. एक लाख रुपयांपेक्षा अधिक रकमांच्या संशयास्पद व्यवहारांवर प्रशासन करडी नजर ठेवून आहे. यासाठी बँकांनी आपापल्या बँकेच्या पातळीवर समन्वयक अधिकारी नियुक्त करावेत आणि या अधिकाऱ्यांनी संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवून, याबाबतची माहिती अग्रणी बँकेच्या अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा प्रशासनाला तात्काळ माहिती द्यावी, असे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.



जिल्हाधिकारी जावळे यांच्या अध्यक्षतेखाली लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व बँकांच्या अधिकाऱ्यांची मंगळवारी बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

लोकसभा निवडणुकीत पैशाचा गैरवापर प्रभावीपणे रोखण्यासाठी आणि निःपक्ष निवडणुका घेण्यासाठी निवडणूक आयोगाने काही पावले उचललेली आहेत. यामध्ये बँकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. बँकेच्या एखाद्या शाखेत पैशाची मागणी अचानक वाढली आहे का, याबाबतही बँका माहिती घेतील. तसेच वॉलेटद्वारे पेमेंटमध्ये अधिक मागणी असल्यास त्यावरही लक्ष ठेवण्यात येणार आहे. बँका दररोज संशयास्पद व्यवहारांची माहिती जिल्हा प्रशासनाला कळवतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखाधिकारी राहुल कदम यांनी बँकांनी या काळात करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात सादरीकरण केले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी, जिल्हा कोषागार अधिकारी देवीदास टोंगे आदी उपस्थित होते.

# अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार टाकणार



## जुई हब्बास येथील शेतकऱ्यांचा प्रशासनाला इशारा


| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील जुई हब्बास गावातील खाडीत बेसुमार वाळूउपसा सुरू आहे. यामुळे येथील शेती, स्थानिक, पर्यावरण व जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे येथील संतप्त ग्रामस्थ भीतीच्या छायेत आहेत. त्यांनी या बेसुमार वाळूउपशावर निर्बंध आणण्यासाठी संबंधित विभाग व शासनाकडे तक्रारी अर्ज केले आहेत. तसेच आंदोलनाचा इशारादेखील दिला आहे. याबरोबरच संतप्त ग्रामस्थ, शेतकऱ्यांनी आगामी निवडणुकीवर पान २ वर

# भारत प्रदूषणात अव्वल

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेनं वाटचाल करणाऱ्या भारताच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रम झाल्याचं नुकतंच एका सर्वेक्षणाच्या अहवालावरून समोर आलं आहे. स्वीस एअर मॉनिटरिंग बॉडी IQAir नं हा सर्वे केला असून, त्यानुसार बांगलादेश आणि पाकिस्तानच्या पाठोपाठ भारत हा जगभरातील तिसरा सर्वाधिक प्रदूषित देश ठरला आहे. ‘वर्ल्ड एअर क्वॉलिटी रिपोर्ट २०२३’च्या निष्कर्षांनुसार १३४ देशांच्या यादीत भारताचा प्रदूषित हवेच्या निकषांवर तिसरा क्रमांक लागतो. त्याशिवाय जगभरातील सर्वाधिक प्रदूषित ५० शहरांमध्ये एकट्या भारतातील ४२ शहरांचा समावेश असून, सातत्याने चौथ्यांदा जगातील सर्वात प्रदूषित राजधानी म्हणून दिल्लीचे नाव पुढे आले आहे.



- **सर्वाधिक प्रदूषित देशांमध्ये जगात तिसऱ्या स्थानी**
- **दिल्ली जगातील सर्वात प्रदूषित राजधानी**

जगभरातील विविध देशांमधल्या हवेचा दर्जा तपासण्यासाठी पीएम २.५ चं प्रमाण हे मापक वापरण्यात आलं होतं. त्यानुसार भारतात प्रत्येक क्युबिक मीटर क्षेत्रात ५४.४ माक्रोग्रॅम पीएम २.५ चं केंद्रीकरण झाल्याचं निदर्शनास आलं. बांगलादेशमध्ये हे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच ७९.९ मायक्रोग्रॅम प्रतीक्युबिक मीटर तर त्यापाठोपाठ पाकिस्तानमध्ये पान २ वर

## भारतातील इतर शहरे कोणती?

**बेगुसराय, गुवाहाटी आणि दिल्लीव्यतिरिक्त ग्रेटर नोएडा (११), मुझफ्फरनगर (१६), गुरगाव (१७), अराह (१८), दादरी (१९), पाटणा (२०), फरिदाबाद (२५), नोएडा (२६), मीरत (२८), गाझियाबाद (३५) आणि रोहतक (४७) या शहरांचा या यादीत समावेश आहे.**

# जिल्ह्यात १.१९ कोटींचा मुद्देमाल जप्त

## आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर ७२ तासांत कारवाई

| रायगड | खास प्रतिनिधी |

जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यापासून अवघ्या ७२ तासांच्या आत पोलीस, राज्य उत्पादन शुल्क तसेच अमली पदार्थ विरोधी पथकाने जिल्ह्यात केलेल्या कारवाईत तब्बल एक कोटी १९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

रायगड जिल्ह्यामध्ये ३२-रायगड लोकसभा मतदार संघासाठी ७ मे रोजी पान २ वर

## १४ हजार बॅनर्स, झेंड हटवले : स्नेहा उबाळे

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्यामार्फत शासकीय जागेतील, सार्वजनिक मालमत्ता तसेच खासगी जागेवरील जाहिरातीचे फलक, भिंतीवरील लेखन, पोस्टर्स, फलक, बॅनर व ध्वज असे एकूण १४ हजार ५५९ हटविण्यात आले आहेत. ३२-रायगड लोकसभा मतदारसंघातील पेणमध्ये २ हजार ७१७, अलिबाग १,००९, श्रीवर्धन २,४८२, महाड १,४७९ तर ३३-मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल २,७८३, कर्जत ३,६८७ तर उरणमध्ये ४०२ पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेट हटविण्यात आले आहेत.**

## मतदानाच्या टक्क्यासाठी शालेय विद्यार्थ्यांवर मदार
# पाल्यांकडून पालकांना पत्राद्वारे मतदानाचे साकडे

| रायगड | प्रतिनिधी |

लोकशाहीच्या उत्सवात देशवासियांनी सहभागी व्हावे यासाठी निवडणूक विभागाबरोबर प्रशासन व्यवस्था युद्धपातळीवर कामाला लागली आहे. मतदान जनजागृती करण्यासाठी प्रशासन नवनवीन क्लृप्त्या लढवीत असते. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी शालेय शिक्षण विभागही कामाला लागला असून, विद्यार्थ्यांकडून पालकांच्या स्वाक्षरीने मतदान करण्याबाबतचे पत्र आणावयास सांगितले आहे. शिक्षण विभागाने याबाबतचे निर्देश आणि पत्रासह मजकूर संस्थांना दिला आहे. मतदानाबाबतची जनजागृती करण्याबरोबरच मतदानाचा टक्का

- **परीक्षा हंगामात विद्यार्थ्यांना पत्र आणण्याची जबरदस्ती**
- **शिक्षण विभागाने काढले शैक्षणिक संस्थांना फर्मान**

वाढविण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना माध्यम बनवले आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी शाळांनी पुढाकार घ्यावा. यासाठी शाळांमधील विद्यार्थ्यांनी लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी कोणत्याही दबावाला आणि अमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे विनंती करणारे पत्र पालकांना देऊन त्यांची स्वाक्षरी घेऊन पुन्हा शाळेत आणावे आणि त्याचा अहवाल शाळेने शिक्षण विभागाला सादर करावा, असे फर्मान शिक्षण विभागाने काढले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत मतदान जनजागृती करण्याचे सोडून शिक्षण विभागाने शालेय विद्यार्थी आणि मतदान प्रक्रिया याची सांगड घालण्याचा प्रयत्न परीक्षांच्या हंगामात घातल्याने शैक्षणिक संस्थांसह पालकांमध्ये नाराजी पसरली आहे.

दत्ताजीराव खानविलकर ट्रस्टचे अध्यक्ष अमर वार्डे यांनी शिक्षण विभागाने काढलेल्या पान २ वर

### पाचवी ते आठवीची वार्षिक परीक्षा आठ दिवसात संपवा

**इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन कार्यपद्धती दि. ७ डिसेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य मंडळाचा अभ्यासक्रम असणाऱ्या सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व मान्यताप्राप्त शाळांच्या दि. २८ मार्च ते दि. ४ एप्रिल कालावधीमध्ये वार्षिक परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव यांनी दिली आहे.**

भारतीय लोकशाहीवर माझा नितांत विश्वास आहे. असे असले तरी शालेय विद्यार्थ्यांकडून आपल्या पालकांना निर्भयपणे मतदान करण्याची विनंती, हा विनोद म्हणावा लागेल. शिक्षण विभागाने पाठवलेले पत्र विद्यार्थ्यांकडून लिहून ऐन परीक्षा कालावधीत पालकांपर्यंत पोहोचवायचे आणि परत जमा करायचे हा द्राविडी प्राणायामाचा भाग आहे. बालबुद्धी असणाऱ्या मुलांकडून आपल्या पालकांचे मतदान करण्यासाठी कान टोचणे हा दैवदुर्विलास म्हणावा लागेल.
- अमर वार्डे, अध्यक्ष,
दत्ताजीराव खानविलकर ट्रस्ट

# मुंबई इंडियन्सचा ताफा अलिबागेत

| अलिबाग | प्रतिनिधी |

आयपीएलचा रणसंग्राम २२ मार्चपासून सुरू होत आहे. या स्पर्धेत आयपीएलमधील महत्त्वपूर्ण संघ मुंबई इंडियन्स हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखाली सहभागी होणार आहे. त्याआधी या संघाला विश्रांती मिळावी यासाठी पूर्ण ताफा अलिबाग येथील रेडिसन रिसॉर्टमध्ये मंगळवारी दाखल झाला आहे. दोन दिवस हा संघ येथे मुक्कामी असणार आहे. त्यामुळे मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया येथून ५२ जणांचा ताफा पीएनपी कॅटमरनने मांडवा येथे जलवाहतुकीने दाखल झाला आहे.

गेटवे येथे बसने मुंबई इंडियन्स संघ मंगळवारी (दि.१९) सकाळी दाखल झाली. त्यानंतर सर्व ताफा पीएनपी जलवाहतुकीने मौजमजा



**रेडिसन रिसॉर्टमध्ये मुक्काम**

करीत मांडवा येथे आला. त्यानंतर बसने हा संघ अलिबाग-गोंधळपाडा येथील रेडिसन रिसॉर्टमध्ये पोहोचला. यावेळी रिसॉर्ट प्रशासनाने टीमचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. एक दिवस मुंबई इंडियन्स संघ अलिबागमध्ये रिसॉर्टला राहणार आहे. त्यानंतर बुधवारी (दि.२०) हा संघ झिराड येथील एका खासगी फार्म हाऊसवर राहण्यास जाणार आहे. यावेळी हार्दिक पांड्या, आकाश मढवाल, अंशुक कंबोज, अर्जुन तेंडुलकर, डेवॉल्ड ब्रेव्हिस, दीलशान मदुशंका, गेराल्ड कोएत्झी, इशान किशन, कुमार कार्तिकेया, मोहम्मद नबी, नमन धीर, नेहाल वढेरा, नुवान तुशारा, पीयूष चावला, रोमारिओ शेफर्ड, शाम्स मुलानी, शिवलिक शर्मा, श्रेयस गोपाल, पान २ वर

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# चवदार तळे राष्ट्रीय स्मारकाकडे शासनाचे दुर्लक्ष

## प्रतिवर्षी केला जातोय लाखो रुपयांचा खर्च



**। महाड । वार्ताहर ।**

महाड शहरातील चवदार तळे हे शासनाच्या उदासीनतेमुळे कायम उपेक्षित राहात आहे. गेली पंधरा वर्षांहून अधिक काळात या राष्ट्रीय स्मारकाच्या विविध कामांसाठी लाखो रुपयांचा निधी खर्ची टाकला जात आहे मात्र हा निधी ठोस उपाय योजनांवर खर्च केला जात नसल्याने आजही हे तळे विकासापासून वंचित राहिले आहे. याबाबत भीमसैनिक नाराजी व्यक्त करत आहेत.

२० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळे येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित शोषित पीडितांच्या पिण्याच्या पाण्याच्या हक्कासाठी सत्याग्रह केला या क्रांती मुळे चवदार तळ्याचे पाणी तनाम दलित शोषित प्रीतांसाठी खुले करण्यात आले या क्रांतीची दखल जागतिक पटलावर नोंद झाली यामुळे संपूर्ण देशभरातून १९ आणि २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या स्मृतिदिनासाठी लाखो भीमसैनिक महाडमध्ये येतात, या चवदार तळ्याला स्पर्श करून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतात. शासनाने या ऐतिहासिक चवदार तळ्याची नोंद राष्ट्रीय स्मारक म्हणून केली आहे, मात्र या राष्ट्रीय स्मारकाची देखभाल दुरुस्ती होत नाही. प्रतिवर्षी वेगवेगळ्या कामाच्या निमित्ताने लाखो रुपये खर्च केले जातात. मात्र, ठोस नियोजन अभावी चवदार तळे विकासपासून आजही वंचित आहे.

चवदार तळ्याचे देखभाल दुरुस्तीचे काम महाड नगरपालिकेच्या ताब्यात आहे. मात्र ज्या पद्धतीने चवदार तळ्याचे सौंदर्यीकरण अबाधित राहणे आवश्यक आहे, त्या पद्धतीमध्ये ते ठेवले जात नाही. चवदार तळ्याच्या ठिकाणी १९ /२० मार्च, २५ डिसेंबर मनुस्मृती दहन दिन आणि सहा डिसेंबर महापरिनिर्वाण दिन १४ एप्रिल महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती, अशा विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने भीमसैनिक चवदार तळ्यावर दाखल होत असतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात पर्यटक, शैक्षणिक सहली, चवदार तळे पाहण्यासाठी येत असतात. वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने महानगरपालिका केवळ तात्पुरत्या रंगरंगोटीचे काम करते. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना भीमसैनिकांना राहण्याची किंवा स्वच्छतागृहांची पुरेशी सुविधादेखील नाही. चवदार तळ्याच्या ज्या पायऱ्यांवरून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर खाली उतरले आणि पाण्याला स्पर्श केला त्या पायऱ्यांचीदेखील दुरवस्था झालेली आहे.

# क्रांतीदिनी उसळणार भीमसागर

■ जिल्हा परिषद आरोग्य विभाग सज्ज

■ आंबेडकर अनुयायींच्या सेवेसाठी चार पथकं तैनात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

चवदार तळे सत्याग्रहाच्या ९६ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लाखोंच्या संख्येने अनुयायी महाड येथे दाखल होणार आहेत. त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज असल्याची माहिती जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ मध्ये क्रांती घडवून आणली. चवदार तळ्यातील पाणी दलितांना खुले करून दिले. त्यामुळे हा क्रांती दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी रायगड जिल्ह्यासह वेगवेगळ्या जिल्ह्यातील अनुयायी महाडमध्ये येऊन चवदार तळ्याला भेट देतात. तसेच तळ्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास अभिवादन केले जाते. आबालवृद्धांपासून सर्वच मंडळी महाडमध्ये दाखल होतात. बुधवारी (दि.२०) मार्च रोजी महाड येथे जनसागर दाखल होणार आहे. सध्या तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. महाडमध्ये येणाऱ्या अनुयायींना उन्हामुळे त्रास होऊ नये, त्यांच्यावर वेळेवर उपचार व्हावेत, यासाठी रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभागाने चार पथकं तयार केली आहेत. महाड येथील वीर रेल्वे स्थानक, गांधारपाले व शहरात ही पथकं कार्यरत असणार आहेत. या परिसरात चार रुग्णवाहिका, औषधांचा साठा उपलब्ध करण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांसह २५ हून अधिक कर्मचारी या ठिकाणी असणार आहेत. महाडचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन बावडेकर यांच्या नेतृत्वाखाली हे काम केले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद आरोग्य विभागाने दिली.

# जलवाहिनी पुन्हा फुटली; हजारो लीटर पाणी वाया

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल सेक्टर ३, ४, ८, ९, १०, ११ परिसरात जागोजागी महानगर कंपनीच्या गसचे पाईप लाईन टाकण्याची कामे सुरू आहेत. येथील खोदकाम करताना पुन्हा सेक्टर ११ येथील अरुणोदय क्लिनिकच्या बाजूला महानगर गसचे कामे रस्त्यावर सुरु असताना जेसीबीने खोदकाम करताना पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी फुटली. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात शेकडो लीटर पिण्याच्या पाण्याची नासाडी होत आहे.



या पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्यांकडे कंत्राटदाराकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे या परिसरात भूमीगत रस्त्याखालून जाणाऱ्या जलवाहिन्या फुटून हजारो लीटर पाणी वाया जाण्याच्या घटना या परिसरात वारंवार घडत असतात. गेल्या दोन महिन्यांपूर्वी सेक्टर ३ येथील निल रेसिडेंसी सोसायटीसमोर जलवाहिनी फुटून हजारो लीटर पिण्याच्या पाण्याची नासाडी झाली.

तसेच दहा महिन्यांपूर्वी नवीन पनवेल येथील डीएव्ही शाळेसमोरच्या रस्त्यावर सिध्द विनायक सोसायटीसमोर रस्त्याचे खोदकाम करताना जलवाहिनी फूटून हजारो लिटर पिण्याच्या पाण्याची नासाडी झाली. यामुळे येथिल नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून नवीन पनवेलचा पाणीप्रश्न जटिल झाला असून, पाण्यावाचून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. नवीन पनवेलमध्ये बऱ्याच भागात नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागत आहे. दुसरीकडे सिडको प्रशासनाच्या व महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीमुळे पाईपलाइन फुटून हजारो लीटर पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होत आहे.

# भूखंड हस्तांतराचा मुहूर्त हुकणार?

■ प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजी

**। उरण । वार्ताहर ।**

मागील कित्येक वर्षांपासून रेंगाळत पडलेल्या जेएनपीए साडेबारा टक्के विकसित भूखंड हस्तांतरीत करण्याचा मुहूर्त हुकणार आहे. जेएनपीटी साडेबारा टक्के विकसित भूखंडांचा ताबा मार्च २०२४ पर्यंत देण्याचे आश्वासन सिडकोने दिले होते. मात्र, मार्च महिन्याच्या मध्यावरही भूखंडावर मातीचा भराव आणि रस्ते गटारांची कामे अर्धवट अवस्थेत सुरू असल्यामुळे भूखंड ताब्यात देण्याची मार्चची तारीखही हुकणार असल्याचे चित्र आहे. यामुळे जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांनी मात्र सिडको आणि जेएनपीए प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

सिडकोने जेएनपीटी साडेबारा टक्के विकसित भूखंडांचा मार्च २०२४ ला प्रत्यक्ष ताबा देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, भूखंडावरील विकासकामे आणि भरावाची कामे अपूर्ण असल्यामुळे मार्चपर्यंत ताबा मिळणार का, असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. अनेक वर्षे संघर्ष केल्यानंतर जेएनपीएने प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंड देण्यास मंजुरी दिली होती. मात्र, मंजुरी दिल्यानंतरदेखील भूखंड वाटपात दिरंगाई होत असल्याने जेएनपीटी साडेबारा टक्केधारक शेतकरी मागील अनेक वर्षांपासून प्रतिक्षेत आहेत. उरण-पनवेल मार्गावरील दास्तान ते करळदरम्यानच्या अतिशय मोक्याच्या भूखंडांवर जेएनपीटीमधील शेतकऱ्यांना हे भूखंड मिळणार आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या रेट्यामुळे साडेबारा टक्के भूखंड वाटपाच्या प्रकिया सुरू झाली होती. यातील प्रकल्पग्रस्तांची कागदपत्रे सादर झाल्यानंतर प्रत्यक्ष भूखंड वाटप म्हणून आखणी करून प्रकल्पग्रस्तांच्या भूखंडाचे नाव व क्रमांक टाकून दसऱ्याच्या मुहूर्तावर भूखंड निश्चित करण्याचे आश्वासन सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी दिले होते. मात्र, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होताना दिसत नाही.

# ‘वंचित’चा काँग्रेसला सात जागांवर पाठिंब्याचा प्रस्ताव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीत सामील झाल्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या जागावाटपाबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. मात्र, अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसला राज्यात सात जागांवर पाठिंबा देण्याचा प्रस्ताव पत्राद्वारे दिला आहे. यावर काँग्रेसकडून कुठलाही अल्टिमेटम ’वंचित’ला देण्यात आला नसल्याचं वंचितनं स्पष्ट केलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपासंदर्भात महाविकास आघाडीत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. वंचित बहुजन आघाडीला चार जागा सोडल्या जातील, अशी केवळ चर्चा सुरू आहे. मात्र, त्यावर अद्याप शिक्कामोर्तब झालेलं नाही.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना आणखी एक पत्र पाठवलं आहे. या पत्राच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाला सात जागांवर ’वंचित’कडून पाठिंबा देण्याचा प्रस्ताव आंबेडकरांनी काँग्रेसला दिला आहे. महाविकास आघाडीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या जागांपैकी सात मतदारसंघांची नावं आपण मला द्यावीत. तुमच्या पसंतीच्या या सात जागांवर काँग्रेसच्या उमेदवारांना आमचा पक्ष पूर्णपणे मतदार संघात पाठिंबा राहिल, अशी ग्वाही वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकरांनी पत्रात दिली आहे.

# तलाठी सजा लोधिवलीचा प्रभारी चार्ज चौक अथवा तुपगावकडे द्या

## नढाळ, लोधिवली, सांरग वयाळ ग्रामस्थांची मागणी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील चौक परिसरामधील तलाठी सजा लोधिवलीचा प्रभारी चार्ज तलाठी सजा चौक अथवा तुपगाव यांच्याकडे सोपवा, अशी मागणी नढाळ, लोधिवली, सांरग वयाळ येथील ग्रामस्थांनी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्याकडे निवेनाद्वारे केली आहे. यावेळी अ‍ॅड. सचिन चाळके, लोधिवली उपसरपंच समीर दळवी, संतोष भोसले, सागर नवघने, राजेंद्र जमदाडे आदी प्रमुख ग्रामस्थ उपस्थित होते.



याबाबत अ‍ॅड. सचिन चाळके म्हणाले की, नढाळ, लोधिवली, सारंग, वयाळ या चारही गावची तलाठी सजा स्वतंत्र अशी लोधिवली म्हणून महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेली आहे. परंतु, तलाठी सजा लोधिवलीकरिता स्वतंत्र असा तलाठी यांची नेमणूक न झाल्याने मागील एक वर्षापासून तलाठी सजा लोहोप यांच्याकडे प्रभारी चार्ज दिलेला आहे. वरील चारही गावाच्या हद्दीत आदिवासी समाजाच्या जमीन मिळकती आहेत. तसेच इतर व्यक्तींच्या जमीन मिळकती आहेत. तर अर्जदार यांना सातबारे उतारे व इतर पंचनामे, जबाब याकरिता लोहोप या ठिकाणी जावे लागते. सदर सजा ही नढाळ लोधिवली या गावांपासून दूर आहे. तसेच आदिवासी समाजातील व्यक्तीकडे स्वताचे वाहन नसल्याने त्यांना रिक्षा करून तलाठी सजा लोहोप या ठिकाणी जावे लागते, चौक या ठिकाणी मंडळ अधिकारी यांचेदेखील कार्यालय आहे. त्यामुळे मंडळ अधिकारी चौक यांच्या कार्यालयाच्या शेजारी असलेल्या तलाठी सजा तुपगाव व चौक या ठिकाणी तलाठी सजा लोधिवली यांचा प्रभारी चार्ज दिल्यास नागरिकांचा वेळ व पैसा वाचेल.

# पनवेल परिसरात ‘रात्रीस खेळ चाले’

## महामार्गावर अंधारात पुन्हा एकदा वृक्षतोड

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

जाहिरात फलकांना अडथळा ठरत असलेल्या वृक्षाची तोड करण्यात आल्याचा प्रकार सायन-पनवेल महामार्गावर घडला आहे. नेहमीप्रमाणे रात्रीच्या अंधारात ही तोड करण्यात आल्याने कोण्या अज्ञात व्यक्तीने फलकांना अडथळा ठरणारे हे वृक्ष छाटून अप्रत्यक्षपणे जाहिरात फलक कंपनीला मदत केलेली असण्याची शक्यता परिसरातील नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



पनवेल पालिका हद्दीतील विविध महामार्गालगत असलेल्या वृक्षांवर विष प्रयोग करण्यासोबत रात्रीच्या अंधारात इलेक्ट्रिक कटरच्या सहाय्याने वृक्षतोड करण्याचे प्रकार घडत आहेत. महत्त्वाचे म्हणजे, आतापर्यंत ज्या परिसरातील वृक्षांवर बेकायदेशीररित्या कुऱ्हाड चालवली जाते, त्या परिसरात नेहमीच कुठल्या न कुठल्या जाहिरात कंपन्यांचे अवाढव्य फलक लावण्यात आल्याचे व तोडण्यात आलेले वृक्ष अशा जाहिरात फलकांना अडथळा ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे रात्रीच्या अंधारात करण्यात येणारी ही वृक्षतोड नक्की कोणाच्या पथ्यावर पडते, असा सवाला उपस्थित केला जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, परिसरातील शीख समाजाच्या वतीने सायन-पनवेल महामार्गालगत वड आणि पिंपळाच्या झाडांची लागवड आणि संगोपन करण्यात आले आहे. शीख समाजाने मोठ्या परिश्रमाने वाढवलेले हे वृक्ष छाटण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

## पान १ वरून

### ‘उमटे’चे पाणी शेवाळमिश्रित

अधिक वर्षे जुन्या असलेल्या या धरणातून रामराज, सुडकोली, बोरघर, चिंचोटी, बेलोशी, खानाव, बामणगाव, वरंडे, आक्षी, नागाव, रेवदंडा, चौल या ग्रामपंचायत क्षेत्रातील ४५ गावांतील सुमारे ६० हजारांहून अधिक नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो.

पाण्याची पातळी कमी झाल्याने माती, गाळमिश्रित पाणी नळाद्वारे येत आहे. दूषित पाण्यामुळे उलटी, जुलाब, कावीळ, विषमज्वरसारखे जलजन्य आजार होण्याचा धोका निर्माण झाला आहे. रायगड जिल्हा परिषदेवर गेल्या दोन वर्षांपासून प्रशासनामार्फत कारभार चालत आहे. या प्रशासनाकडूनच धरणातील दूषित पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा होती. परंतु, प्रशासनाने तालुक्यातील ६० हजार नागरिकांची घोर निराशा केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून धरणातून गाळमिश्रित पाणी येत असून, त्या पाण्याला दुर्गंधी येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. याबाबत जिल्हा परिषदेने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### अलिबागची पाणी योजना लालफितीत

अलिबागकरांना आणखी किती दिवस पाण्यासाठी वाट पाहावी लागणार आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नगरोत्थान योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यासाठी हा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला असल्याची माहिती येथील अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

### अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार टाकणार

बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत जय हनुमान शेतकरी सामाजिक विकास संस्थेने संबंधित प्रशासनास निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले की, जुई हब्बास खाडीत बांधबंदिस्तीलगत वाळूउपसा करण्यास आम्हा शेतकऱ्यांचा विरोध आहे. कारण, यामुळे आमच्या जुई हब्बास खाडीत बंदिस्तीला २०१७ साली मोठ मोठ्या खांडी गेल्या आहेत. याची तक्रार आम्ही सर्व शेतकऱ्यांनी शासन दरबारी जिल्हाधिकारी, तहसीलदार, खारभूमी विभाग रायगड, पेण, यांना वारंवार लिखीत स्वरुपात दिली; परतु शासनाने आम्हा शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे मदत केली नाही, त्यामुळे २०१७ साली २८०० एकर जमीन खांडी जाऊन समुद्राच्या खाऱ्या पाण्याखाली येऊन नापीक झाली. त्यामुळे आम्हा शेतकऱ्यांवर सात वर्षे उपासमारीची वेळ आली. तेव्हा कोणताही पर्याय राहिला नाही. शेवटी हताश झालेल्या शेतकऱ्यांनी अनेक वेळा आपल्या शासकीय अधिकारी यांच्याकडे खांडी बांधून शेती वाचविण्यासाठी विनंती अर्ज केले, आंदोलने व उपोषणे केली आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक वेळा बैठक झाल्या व तेव्हा जेएसडब्ल्यू कंपनीच्या प्रशासनासोबत बैठक होऊन सीएसआर फंडातून निधी देण्यात आला. त्यानंतर बंदिस्ती व उघाडीचे काम खारभूमी विभाग, रायगड-पेण यांच्या देखरेखीखाली २०२१ रोजी चालू करण्यात आले. जेएसडब्ल्यू कंपनीने दिलेल्या ठेकेदाराने माती-मुरूम व दगडी पिचिंग लावून काम करून देणे होते. तसे न करता कंपनीने आपल्या कंपनीचे केमिकलयुक्त वेस्ट मटेरियल टाकून पूर्ण बंदिस्ती केली. अशा प्रकारे आमच्या शेतकऱ्यांची जेएसडब्ल्यू कंपनीनेदेखील फसवणूक केली. त्याची तक्रारदेखील शेतकऱ्यांनी खारभूमी उपविभाग रायगड-पेण यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, बंधिस्तकाठा पूर्ण झाल्यानंतर गेल्या वर्षीपासून शेतकऱ्यांनी आपापल्या शेतीच्या मशागतीला सुरुवात केली व शेती पिकवायला सुरुवात केली. आता शेती पिकणार आणि आमची मुलेबाळे चार घास सुखाने खातील या आशेने असतानाच पुन्हा जुई हब्बास खाडीच्या समुद्राच्या बंदिस्तीलगत वाळूउपसा सुरु झाला असून, त्यामुळे खाडीच्या बंदिस्तीला खांडी जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा त्याच शेतकरी बळिराजावर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता आहे. तरी, याठिकाणी सुरू असलेला वाळूउपसा तात्काळ बंद करावा व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा जय हनुमान शेतकरी सामाजिक विकास संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी उपोषणचा इशारा दिला आहे. तसेच शासनाने कोणतीही दखल घेतली नाही तर आगामी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्धार केला आहे.

### पाल्यांकडून पालकांना पत्राद्वारे मतदानाचे साकडे

आदेशावर नाराजी व्यक्त करून विद्यार्थ्यांकडून पालकांना मतदान करण्याबतचे विनंती पत्र पाठविणार नसल्याचे शिक्षण विभागाला कळविले आहे. पत्राची तामिली न करण्याचा अपराध केल्याबद्दल लोकशाहीच्या भवितव्यासाठी होणारी शिक्षा स्वीकारण्यास तयार असल्याचेदेखील शिक्षण विभागाला कळविले आहे. शिक्षण विभागाने पाठवलेले पत्र व्याकरणदृष्ट्या अशुद्ध लेखनात मोडणारे असल्याने मराठीला राजभाषेचा दर्जा केंद्र सरकार का देत नाही यावर प्रकाश पडला असल्याचा उल्लेख करून अमर वार्डे यांनी शालेय शिक्षण विभागाला कानपिचक्या दिल्या आहेत.

### मुंबई इंडियन्सचा ताफा अलिबागेत

सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, टीम डेव्हिड, विष्णू विनोद, ल्युक वूड आदींसह प्रशिक्षक असा ५२ जणांचा ताफा रेडिसन रिसॉर्टमध्ये दाखल झाला आहे.

मुंबई इंडियन्स संघ रेडीसन रिसॉर्टमध्ये दाखल झाल्यानंतर रिसॉर्टमधील पर्यटकांची त्यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी लगबग सुरू होती. यावेळी पीयूष चावला याच्यासोबत बच्चे कंपनीने फोटो काढले.

### जिल्ह्यात १.१९ कोटींचा मुद्देमाल जप्त

मतदान होणार आहे. १६ मार्चपासून आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचार संहितेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासन, राज्य पोलीस विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, जीएसटी विभाग, अमली पदार्थ विरोधी विभाग, पोस्ट विभाग, इंडियन कोस्ट गार्ड, एअरपोर्ट ॲथोरिटी या विविध यंत्रणांच्या माध्यमातून अवैध दारु विक्री, रोख रकमेची हाताळणी याकडे विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. यासाठी विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांकडून आतापर्यंत करण्यात आलेल्या कारवाईची माहिती इलेक्शन सिझर मॅनेजमेंट सिस्टिम (इएसएमएस) मध्ये नोंदविण्यात आली आहे.

### भारत प्रदूषणात अव्वल

हे प्रमाण ७३.७ मायक्रोग्रॅम प्रतीक्युबिक मीटर इतकं आढळून आलं.

दरम्यान, एकीकडे सर्वाधिक प्रदूषित देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानी असताना दुसरीकडे सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातल्या तब्बल ४२ शहरांचा समावेश आहे. जहभरातलं सर्वाधिक प्रदूषत शहर बिहारमधील बेगुसराय ठरलं असून, त्यापाठोपाठ गुवाहाटी व दिल्ली या दोन शहरांचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक लागतो.

२०२३मध्ये बेगुसरायमध्ये प्रती क्युबिक मीटर पीएम २.५ चं प्रमाण ११८.९ मायक्रोग्रॅम इतकं आढळून आलं. गेल्या वर्षी हेच प्रमाण तब्बल १९.७ इतकं कमी होतं. गुवाहाटीमद्ये हेच प्रमाण २०२२ मधील ५१ वरून २०२३ मध्ये तब्बल १०५.४ मायक्रोग्रॅम प्रती क्युबिक मीटर इतकं वाढल्याचं आढळून आलं आहे. दिल्लीत हेच प्रमाण याच काळात ८९.१ वरून ९२.७ मायक्रोग्रॅम प्रती क्युबिक मीटर इतकं वाढल्याचं दिसून आलं आहे.

कशी गोळा केली माहिती?

दरम्यान, या सर्वेक्षणासाठी नेमकी माहिती कशी गोळा करण्यात आली, याबाबतही IQ Air कडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. या सर्वेक्षणासाठी १३४ देशांमधील ७ हजार ८१२ ठिकाणी उभारण्यात आलेल्या तब्बल ३० हजार एअर स्टेशन्सच्या माध्यमातून माहिती गोळा करण्यात आली.

# कुंभार समाजाचा वर्धापनदिन उत्साहात

**। चिरनेर । वार्ताहर ।**

नवीमुंबई कुंभार समाज मंडळाचा अकरावा वर्धापन दिन सोहळा नुकताच नवी मुंबई येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र प्रदेश कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सतीश दरेकर यांनी भूषविले होते. वर्धापन दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी हळदी कुंकू सोहळा, कुंभार भूषण पुरस्कार सोहळा, वधू वर सूचक मेळावा, विद्यार्थी गुणगौरव सोहळा, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार सोहळा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी रसिका खेडेकर, महेश सायकर, वसंत घोडनदीकर, बाळासाहेब कुंभार, पांडुरंग कुंभार, गजानन चौलकर, यशवंत शेंदुळकर, अजय विरकर, अमोल केंबुलकर, शशिकांत चांदेकर, गंगाधर देवडे, अनंत महाडकर, भास्कर कल्याणकर, शरद खारकर, रामजी प्रजापति, नंदकुमार चिरनेरकर, रमाकांत गोरे, जितेंद्र पाभरेकर, राम पान्हेरकर यशवंत अष्टेकर, दिनेश बिरवाडकर, स्वप्निल केंबुलकर, विष्णू चौलकर, चेतन चौलकर, पंढरीनाथ मांडलेकर, प्रसाद चौलकर, दीपक गोरे उत्तम कोळंबेकर, शिवाजी भागवत तसेच महिला पदाधिकारी मीना चौलकर, प्रतिभा वाडेकर, अप्रिता कुंभार, प्रणाली लाड, नीलम चौलकर, भारती मांडलेकर, रोशनी चौलकर, अर्चना शिर्के, सविता गोरे, संपदा देवडे, आशा चांदेकर, गीतांजली उकिडे, वनिता गडदे आदी उपस्थित होते.

# उरणमध्ये आरोग्य सुविधांचा बोजवारा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण पूर्व विभागात आरोग्य सुविधांचा बोजवारा उडाला आहे. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकीकडे कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नसून दुसरीकडे वेळेवर डॉक्टर हजर होत नसल्याचे चित्र आहे. उरणमध्ये लवकरच १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे सांगितले जात असलेतरी त्याला किती दिवस लागतील, याबाबत साशंकता आहे. एकीकडे कंटेनर यार्डमुळे मोठ्या प्रमाणावर अपघात होत असून जवळपास अद्ययावत रुग्णालय नसल्याने अनेकांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे तालुक्याचा विकास होत असताना आरोग्य सुविधेकडे दुर्लक्ष होत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

औद्योगिकीकरणाकडे वाटचाल करणारा उरण तालुका हा कित्येक पायाभूत सुविधांपासून वंचित आहे. त्यामध्ये रस्ते, पाणी आणि आरोग्य सुविधा यांचा समावेश आहे. अलीकडे शहरीकरण झालेल्या उरण परिसरात एकही आधुनिक सुसज्ज असे रुग्णालय नसल्याने तालुक्यातील नागरिकांना मुंबई, नवी मुंबई, पनवेलकडे उपचार घेण्यासाठी जावे लागते. त्यामध्ये सर्वात जास्त हाल उरण तालुक्यातील पूर्व विभागातील नागरिकांचे होत आहेत.

निवडक

## स्थानिक फळभाज्यांना पसंती

**रसायनी :** रसायनीतील वासांबे मोहोपाडा बाजारपेठेत स्थानिकांच्या उन्हाळी फळभाजीपाल्याला मागणी वाढत आहे. अगदी वाजवी दरात ताजी भाजी मिळत असल्याने ग्राहक पसंती देत आहे. बाजारामध्ये गवार, भेंडी, कारली सुमारे साठ रुपये किलो आणि चवळी, मिरची सुमारे ऐंशी रुपये किलो तसेच शापू, मेथी, कोथिंबीर पंधरा रुपये जुडी असा साधारण भाव मिळत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. शिवाय, या फळभाज्या ताज्या असल्याने त्याची विक्री मोठ्या प्रमाणावर होते.

## ग्राहक दिनानिमित्त जनजागृती

**अलिबाग :** अलिबाग बस स्थानक येथे जागो ग्राहक अभियान अंतर्गत अलिबाग विभागांतर्गत निरीक्षक वैध मापन शास्त्र यांच्या वतीने ग्राहकांचे व बस स्थानक परिसरातील नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले. या वेळी निरीक्षक वैध मापन शास्त्रचे अधिकारी सु. रा. देवकाते यांनी नागरिकांना ग्राहकांचे अधिकार, नागरिकांनी फसवणूक होऊ नये यासाठी काय खबरदारी घ्यावी तसेच छापील किमतीपेक्षा जास्त दराने वस्तू खरेदी करू नये, याविषयी प्रबोधन केले.

## पारितोषिक वितरण समारंभ

**खरोशी :** पेण शिक्षण महिला समितीच्या, श्रीमती सुमतीबाई देव प्राथमिक विद्यालय पेण येथे पारितोषिक वितरण समारंभ संस्थेच्या अध्यक्षा सुहासिनी देव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. सदर कार्यक्रमास पेण नगरपालिका प्रशासनाधिकारी संगिता माने या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्षा, प्रमुख पाहुण्या व संस्थेचे कार्यकारी मंडळ यांना लेझीम पथकाच्या तालात मानवंदना देण्यात आली व स्वागत करण्यात आले.

## एक्सलन्स अवार्डने सन्मान

**रसायनी:** आदर्श मुंबई फाऊंडेशन व इंटरनॅशनल ह्यूमन राईट्स सेवा संघाच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत आनंदीबाई म्हात्रे सभागृह विक्रोळी येथे महाराष्ट्रातील गुणवंतांचा एक्सलन्स स्टार पुरस्काराने सन्मान करण्यात आला. डॉ. संजय भोईर, भालचंद्र पाटे, अशोक भोईर, पूनम पाटगावे यांच्यातर्फे सामाजिक, साहित्य, शिक्षण, वैद्यकिय, उद्योग, कला, क्रीडा, सरपंच क्षेत्रात उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

## निरोप समारंभ संपन्न

**तळा :** तळा मराठी शाळेचे शिक्षक संतोष घुटुकडे यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. तळा मराठी शाळेची पटसंख्या अवघी १४ असताना संतोष घुटुकडे यांची तळा मराठी शाळेवर नियुक्ती झाली. बघता बघता पटसंख्या ८७ वर पोहचली. त्यांची शाळेतून बदली झाल्याने त्यांना बदलीच्या ठिकाणी तात्काळ हजर रहावे लागले. त्यामुळे त्यांचा निरोप समारंभ होऊ शकला नाही. मात्र त्यांनी शाळेला भेट दिली असता त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन केले होते.

# विविध परवानग्यांसाठी एक खिडकी योजना

### जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

### राजकीय पक्ष, उमेदवारांसाठी नियोजन

**। रायगड । खास प्रतिनिधी ।** लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीकरीता विविध राजकीय पक्षांना, उमेदवारांना प्रचारासाठी विविध प्रकारच्या परवानग्या, परवाने घ्यावे लागतात. त्यांना त्या तात्काळ उपलब्ध व्हाव्यात. यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली. एक खिडकी योजना कार्यान्वित करण्याच्या निवडणूक आयोगाच्या सूचना आहेत. त्यानुसार एक खिडकी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाचे उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके हे नोडल अधिकारी आहेत.

**वाहन परवाना**

यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी/ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा. यासाठी संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात.अर्जासोबत विहित नमुन्यातील अर्ज, अर्जदाराचे आधारकार्ड सत्यप्रत, वाहन नोंदणी परवाना सत्यप्रत, उमेदवाराचा नमुना नं.१६ खर्चाबाबतची माहिती सत्यप्रत सादर करावी.

**लाऊडस्पीकर परवाना-**

अर्ज पोलीस निरीक्षक (एका पोलीस स्टेशन हदीत असल्यास), उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे करावा (दोन पोलीस स्टेशन हद्दीत असल्यास),संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे बाबतीत उमेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात.

**ऑनलाईन स्पीकर परवाना**

स्पीकर परवाना अर्ज / www/ home.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर करावा, नागरिक ऑनलाईनवर क्लीक करावे, नवीन यूजर आयडी येथे नोंदणी




करावी, आपाल्या मोबाईल नंबरवर ओटीपीव्दारे पडताळणी करून युजर आयडी आणि पासवर्ड बनविणे, ऑनलाईन सेवेचा अर्ज भरताना इतर आवश्यक पुराव्यांसह फोटो, ओळखीचा पुरावा व पत्यांचा पुरावा जोडावा लागेल, कोणत्या कारणासाठी स्पीकर परवाना पाहिजे वेळ, दिनांक, ठिकाण, आयोजकाचे नाव यांचा स्पष्ट उल्लेख असावा, सदर कागदपत्राची पडताळणी करुन पोलीस स्टेशन येथे ऑनलाईन परवाना प्रत दिली जाईल.

**सभा, मेळावे आदी परवानगीसाठी**

निवडणूक निर्णय अधिकारी/ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा, संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे बाबतीत उमेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात. अर्जासोबत संबंधित पोलीस विभागाकडील ना हरकत प्रमाणापत्र बंधनकारक, जागा मालकाची ना-हरकत, स्थानिक स्वराज्य संस्थेची ना हरकत ही कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**प्रचार कार्यालय उघडण्यास परवाना**

निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा, संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे बाबतीत उमेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात. अर्जासोबत प्रचार कार्यालयासाठी संबंधित इमारत मालक यांचे संमतीपत्र, प्रचार कार्यालयासाठी संबंधित नगरपालिका/ ग्रामपंचायत यांच्याकडील ना हरकत दाखला ही कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**मिरवणूक, रॅली परवानगीसाठी**

निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा, संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे बाबतीत उमेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात. यासाठी संबंधित पोलीस विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे.

**रोड शोसाठी परवानगी**

निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा, संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे बाबतीत उमेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात. यासाठी संबंधित पोलीस विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे.

**हेलिकॉप्टर लँडींग परवानासाठी**

जिल्हादंडाधिकारी, संबंधित पोलीस अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे अर्ज करावा, संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे बाबतीत उमेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात. जिल्हादंडाधिकारी यांच्याकडील ना हरकत दाखला, पोलीस अधीक्षक यांचे अभिप्राय अशी कागदपत्रे अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

**मैदान वापर परवानगीसाठी**

उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा, संबंधित राजकीय पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव व उमेदवाराचे बाबतीत उममेदवाराचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी किंवा स्वतः उमेदवार अर्ज करु शकतात. संबंधित मैदान मालक यांचे संमतीपत्र, मैदान संबंधित नगरपालिका/ग्रामपंचायत यांच्याकडील ना हरकत दाखला अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

# कळंबोलीत पोलिसांचा रूट मार्च



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आगामी लोकसभा निवडणूक भयमुक्त वातावरणात पार पडावी म्हणून नवी मुंबई पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांच्या नेतृत्वाखाली १९ मार्च रोजी रूट मार्च काढण्यात आला.

कळंबोली पोलीस ठाण्यातून काढण्यात आलेल्या या रूट मार्चमध्ये ११ अधिकारी ८० अंमलदार त्यामध्ये आरपीएफ जवान, कळंबोली पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. कळंबोली पोलिस ठाणे हद्दीतील महत्त्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परीसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाची ठिकाणे फिरण्यात आले. पोलीस ठाणे येथून सुरू झालेला हा रूट मार्च सेक्टर १ इ - सेक्टर १, २, ३ ई, ४ ई, ५ ई, ६ ई, ९ ई, १४, ६, ५ येथे फिरून पोलीस ठाणे येथे सांगता करण्यात आली. ६ वाहनांसह पायी भेटी देऊन त्यांना परीसर व परीस्थितीची माहिती देण्यात आली. एप्रिल, मे २०२४ मध्ये होणारी लोकसभा निवडणुकीत आपला अमूल्य मतदानाचा अधिकार भयमुक्त वातवरणात बजावता यावा, या निवडणुकीदरम्यान कोणतेही अनुचित प्रकार होणार नाही, यासाठी या रूट मार्चचे आयोजन करण्यात आले असल्याचे कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांनी सांगितले.

# रेल्वेतून पडल्याने तरुणाने गमावला पाय

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे रेल्वे स्थानकात प्रवासी रेल्वेतून पडून जखमी व मृत्यू होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. अशाचप्रकारे सोमवारी (दि.१८) सायंकाळी ८.२५ वाजण्याच्या सुमारास रेल्वेतून तोल जावून पडल्याने अथर्व संतोष पोकळे हा तरुण प्रवासी गंभीर जखमी झाला आहे. या अपघातात अथर्व याच्या तोंडाला मार लागला असून ऐन उमेदीतील या तरुणाला पाय गमवावा लागला आहे. जखमी तरुणावर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी नेरूळ येथे तातडीने नेण्यात आले. तेथे पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या अपघाताचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि हरेष काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस करीत आहेत.



नागोठणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर पनवेल बाजूकडून येणाऱ्या व रोहा, रत्नागिरी बाजूकडे जाणाऱ्या प्रवासी रेल्वे गाड्या थांबतात. प्रवासी गाड्या असल्याने या गाड्यांना नेहमीच गर्दी असते. मात्र नागोठणे रेल्वे स्थानकातील ज्या फलाट क्रमांक दोनवर प्रवासी उतरतात, त्या फलाटावरील व रेल्वेगाडी फूटरेस्ट यांच्यामधील अंतर सुमारे अर्धा फूट तर उंची सुमारे दोन फूट आहे. त्यामुळे फलाटावर उतरताना प्रवाशांचा तोल जाऊन प्रवासी रेल्वेखाली जाऊन भीषण अपघात होतात. त्यामुळे मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची त्वरित दखल घेऊन नागोठणे रेल्वे स्थानकातील फलाटावर क्रमांक दोनवर तातडीने योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी नागोठणे रेल्वे प्रवासी संघटनेने केली आहे.

# माथेरान पालिकेचे एक कोटी पाण्यात

**। नेरळ । संतोष पेरणे ।**

माथेरान शहरात मलनिःसारण प्रकल्प उभारण्याचे काम सुरु आहे. या प्रकल्पासाठी शासनाकडून ४७ कोटींचा निधी मंजूर असून या प्रकल्पासाठी माथेरान नगरपरिषदेने सल्लागार कंपनी नेमली आहे. तब्बल एक कोटी रुपये या सल्लागार कंपनीला माथेरान पालिका देणार आहे. तरीही प्रकल्पाच्या कामात सल्लागार कंपनीकडून चालढकल केली जात असल्याचे दिसून येत आहे.

सल्लागार कंपनी म्हणून हा ठेका वॉटर गेट कॅन्सल्टसी यांनी मिळविला आहे. या प्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत सल्लागार कंपनी कार्यरत राहणार आहे. त्यासाठी या सल्लागार कंपनीला एक कोटींचा निधी मिळणार आहे.



या प्रकल्पाचे काम करून घेण्यासाठी अभियंता यांच्या माध्यमातून देखरेख ठेवण्याचे आणि प्रकल्पाचे काम नियमानुसार होत आहेत काय? यावर लक्ष ठेवण्याचे काम सल्लागार कंपनी करणार आहे. मात्र माथेरानमधील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे काम केले जात असताना मागील दोन महिन्यात प्रकल्पाचे काम किती पूर्ण झाले हे सल्लागार कंपनीला सांगता आले नाही.

माथेरानमधील महत्वाच्या प्रकल्पासाठी सल्लागार कंपनी म्हणून नेमण्यात आलेल्या कंपनीचे अभियंते उपस्थित राहत नाहीत असे दिसून आले आहे. असा आरोप माथेरान व्यापारी फेडरेशनचे कार्यकर्ते गिरीश पवार, राजेश चौधरी यांनी केला आहे . दोन किलोमीटर पाईप लाईन टाकण्यात आली आहे. त्या सर्व ठिकाणी कुठेही खोदकाम झाल्यावर सिमेंटने पीसीसी केलेली नाही. याबद्दल देखील स्थानिक कार्यकर्ते प्रदीप घावरे यांनी संताप व्यक्त केला आहे.

# आग लागून झाड कोसळले

**। सुधागड/पाली । वार्ताहर ।**

खुरावले फाटा एचपी पेट्रोल पंपासमोरील वडाच्या झाडाला आग लागली होती. त्यामुळे रात्री हे झाड रस्त्यावर कोसळले. या झाडावर धडकून मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला. स्थानिकांनी पाणी मारून आग विझवली. सायंकाळी पुन्हा या झाडाने पेट घेतला. रात्री या आगीमुळे झाडाचा बराचसा भाग भर रस्त्यात खाली कोसळला. यावेळी झाड अंगावर पडून विजय सागळे हे मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सततच्या खोदकामामुळे रस्त्यांची दुरवस्था

**। उरण । वार्ताहर ।**

गेले अनेक महिन्यापासून उरण शहरात व तालुक्यातील अनेक गावात रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात खोदकाम सुरू आहे. यामुळे शहर व गावागावातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

सदरचे खोदकाम हे प्रशासनाच्या परवानगीने होत असले तरी ठेकेदार निकृष्ट काम करून मोकळा होत असून त्याचा रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत संबंधित प्रशासन विभागाकडे तक्रारी करूनही अधिकारीवर्ग याकडे दुर्लक्ष करीत



असल्याचे दिसून येत आहे.

उरण नगरपालिकेने गेल्या पाच वर्षांत शहरातील अनेक भागात सिमेंट-कॉंक्रिटीकरणाचे रस्ते तयार केले. या रस्त्यांच्या कामासाठी कोट्यवधींचा निधीही खर्च केला, मात्र सिमेंट-कॉंक्रीट रस्त्याचे काम करताना या रस्त्याखाली टाकण्यात आलेल्या भुयारी गटारांच्या वाहिन्या फुटण्याचे प्रकार समोर आले. त्यामुळे शहरातील अनेक रस्ते दुरुस्तीकामासाठी खोदण्यात आले आहेत. अनेक वर्षांनंतर कॉंक्रीट रस्ते तयार होत असताना, काही काळातच हे रस्ते पुन्हा मलनि:सारण वाहिनीच्या कामासाठी व विजेची केबल टाकण्यासाठी नगरपालिकेकडून खोदण्यात येत असतात. त्यासाठी थेट सिमेंटचा रस्ताच खोदला. नगरपालिकेच्या भुयारी गटारांच्या कामातील चुकांमुळे वारंवार शहरातील सिमेंट रस्ते खोदण्यात येत असल्याने भोंगळ कारभाराचा फटका शहरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे.

ठेकेदार संबंधित विभागाकडून परवानगी घेऊन खोदकाम सुरू करतात. काही ठिकाणी तर खासगी मालकाच्या जागेत कोणतीही परवानगी न घेता दबाव तंत्राचा वापर करतात. ठेकेदार खोदकाम करून काम झाल्यानंतर फक्त माती ओढून खोदकाम बुजविले जात आहे.



# पालीत कचराकोंडी

## नागरिकांनी शिस्त पाळण्याची गरज

**। पाली / गोमाशी । वार्ताहर ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्रांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. घंटागाड्या फिरून देखील काही नागीरक भरवस्तीत कचरा टाकत आहेत. परिणामी घाण आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पालीतील कचरा समस्येवर मात करण्यासाठी काही वर्षांपूर्वी घंटागाड्या सुरू करण्यात आल्या. सध्या ५ घंटागाड्या कार्यरत आहेत. या घंटागाड्या येथील विविध भागात फिरून दररोज निश्चित वेळेत फिरून कचरा गोळा करतात. आठवड्यातून एकही दिवस सुट्टी घेतली जात नाही. मात्र तरीही अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग पडलेले असतात. प्रमुख्याने बल्लाळेश्वर नगरकडे जाणारा मार्ग, जिल्हा परिषद शाळा, आदिवासी समाजभवनशेजारी, भाग्यश्री प्लाझासमोर आदी ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्यात येतो. घंटागाडी कचरा घेऊन गेल्यानंतर झालेला कचरा काही दुकानदार आणि अनेक नागरिक घरात किंवा सोयटीमध्ये साठवून न ठेवता लागलीच रस्त्यावर टाकतात. तर काहीजण दिवसभर घरी नसल्यास जमा झालेला कचरा रस्त्याच्या कडेला टाकून देतात.

> **पालीत घंटागाडी नियमित फिरत असूनही काही नागरिक रस्त्यावर आपला कचरा टाकतात. परिणामी आजारांना निमंत्रण देतात. घंटागाडी असताना अशाप्रकारे रस्त्यावर व गटारात कचरा टाकणे योग्य नाही. नगरपंचायतीने नागरिकांना घंटागाडीचा वापर करण्यासाठी जनजागृती, दंड व नियोजन करावे.**
>
> **– कपिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पाली**



कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# कुडमुड्यांचा चेहरा

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्टेट बँकेला पुन्हा एकदा फटकारले. निवडणूक रोख्यांबाबतची सर्व माहिती गुरुवारपर्यंत देण्याचा आदेश दिला. यामुळे कोणत्या कंपनीने नेमकी कोणत्या पक्षाला देणगी दिली हे उघड होईल. हे जाहीर होऊ नये यासाठी बँकेतर्फे शेवटपर्यंत धडपड करण्यात आली. त्यामागे अर्थातच मोदींच्या भाजप सरकारची ढोसणी होती. भाजपला या रोख्यांमधून सर्वाधिक म्हणजे सुमारे सात हजार कोटी रुपये मिळाले आहेत. ते कोणाकडून मिळाले हे कळले तर भाजप राजवटीत काही ठराविकांनाच मिळालेली कंत्राटे आणि काही कंपन्यांवर पडलेल्या इडीच्या धाडी इत्यादींचा उलगडा होईल. तो होऊ नये यासाठी भाजपचे पडद्याआडून बरेच प्रयत्न चालू होते. पण सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने ते हाणून पाडले. दोन दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने आपल्याकडची सर्व माहिती उघड केल्यानंतर द्रमुक तसेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससारख्या काही पक्षांनी आपल्याला नेमक्या कोणत्या कंपन्यांनी किती देणग्या दिल्या ते जाहीर करून टाकले. भाजपने मात्र असे करण्यास नकार दिला. एरवी भाजपवाले मारे पारदर्शकपणा, संघाचे संस्कार, देशभक्ती इत्यादींच्या गप्पा मारत असतात. त्यांनी तर सर्वप्रथम ही माहिती द्यायला हवी होती. हे सर्व प्रयत्न फोल ठरल्यावर फिक्की या उद्योगपतींच्या संघटनेला पुढे करण्यात आले. देणगीदारांची माहिती जाहीर करू नका असा अर्ज करण्याचा प्रयत्न झाला. तेही जमेना म्हटल्यावर सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनच्या अध्यक्षांनी राष्ट्रपतींना पत्र लिहिले व चंद्रचूडांच्या निर्णयाला स्थगिती द्यावी अशी विनंती केली. अत्यंत असाधारण परिस्थितीत राष्ट्रपती असे करू शकतात. पण राजकीय पक्षांना दिलेल्या देणग्यांची माहिती उघड झाल्याने देशावर कोणते संकट कोसळणार होते? एकूणच या सर्व धडपडीतून एक स्पष्ट झाले की निवडणूक रोखे ही एक अत्यंत भानगडबाज व भ्रष्टाचारी योजना होती आणि भाजप यामध्ये नखशिखान्त बरबटलेला आहे.

### खंडणीचा सौदा

गुरुवारी या प्रकरणातील आणखी तपशील बाहेर येतील तेव्हा भाजपचा उरलासुरला बुरखा फाटलेला असेल. काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनाही या योजनेतून शेकडो कोटी रुपये मिळाले आहेत. पण भाजपने त्यांच्या कित्येक पटीने पैसे कमावले आहेत. शिवाय, उपद्रव देण्याची भाजपची वृत्ती आणि त्याच्याकडील सत्ता ही इतर कोणाही विरोधकांपेक्षा जास्त आहे. यात काँग्रेस किंवा अन्य पक्षांनी भ्रष्टाचार केला असेलच तर त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी भाजपकडे इडीसारख्या यंत्रणा आहेत. विरोधकांकडे मात्र यातील काहीच नाही. दरम्यान या प्रकरणामुळे राजकीय पक्षांचा मुखवटा फाटला आहे तसाच आपल्या कुडमुड्या भांडवली व्यवस्थेचा खरा चेहराही समोर आला आहे. एरवी आपले उद्योगपती, इंग्रजी वृत्तपत्रे, टीव्ही वाहिन्या इत्यादी मिळून या देशात मुक्त स्पर्धा कशी आवश्यक आहे यावर प्रवचने देत असतात. नेहरू व इंदिरा गांधींच्या काळात सरकारी नियंत्रणांमुळे उद्योगांचा विकास होऊ शकला नाही व आपला देश मागास राहिला असा प्रचार भाजपचे पोपट करीत असतात. नरेंद्र मोदी हे तर यातले अग्रणी. नेहरुंवर टीका केली की लोकांचा समज होतो की आता यांची धोरणे बदललेली आहेत. कंपन्यांच्या गुंतवणुकीचे हजारो कोटींचे आकडे आणि शेअर बाजाराला आलेली भरती यामुळे त्या समजाला आणखी आधार मिळतो. पण प्रत्यक्षात सरकारने उद्योगांच्या सर्व परवानग्या, खाणी इत्यादींचे ठेके, रस्ते इत्यादींची कंत्राटे ही अधिकाधिक आपल्याच हातात राहतील अशी पावले टाकली आहेत. दुसरीकडे इडी किंवा प्राप्तिकर खात्यामार्फत उद्योगांना त्रास तर पूर्वी कधीही नसेल इतका झाला आहे. निवडणूक रोख्यांमधील देणग्या म्हणजे या उद्योगांनी, कंत्राटदारांनी व दलालांनी सरकारला दिलेली खंडणी आहे. कोरोना काळात रेमडिझिविर उत्पादन करणाऱ्या कंपन्यांची चांदी झाली. हे औषध निरुपयोगी असून ते कोरोनावरच्या उपचारात वापरू नये असे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले. तरीही भारतात त्याचा वापर चालू राहिला. यामुळे ज्यांना फायदा झाल्या त्यांनी निवडणूक रोख्यांमध्ये देणग्या दिल्या. विविध भानगडीत अडकलेल्या किंवा कुठले ना कुठले फायदे उकळलेल्या टोरन्ट फार्मा, सन, सिप्ला, डॉ. रेड्डीज, दिवी इत्यादी कंपन्यांनी शेकडो कोटी रुपयांचे रोखे घेतले.

### कम्युनिस्टांचे चारित्र्य

बिर्लाची ग्रासीम, अगरवाल यांची वेदान्त आणि जिन्दाल यांची स्टील कंपनी यांना असाच काही ना काही फायदा झाला व त्याची भरपाई त्यांनी मुक्त हस्ताने केली. एकेकाळच्या लायसेन्स परमिट राजबाबत टीका करण्यात हेच उद्योगपती आणि त्यांचे भाजपमधले भाईबंद पुढे असतात. पण प्रत्यक्षात त्यांनी गेल्या काळापेक्षा दुप्पट रीतीने या भानगडी चालू ठेवल्या आहेत. हाच आजच्या भारतीय भांडवलशाहीचा खरा चेहरा आहे. देणगीदारांची नावे उघड झाली तर दुसऱ्या राजकीय पक्षांकडून त्यांना त्रास दिला जाईल अशी बतावणी करून या योजनेत गुप्तता पाळण्यात आली होती. खरे तर, उद्या समजा काँग्रेस सत्तेत आली असती तर त्यांनाही स्टेट बँकेकडून ही गुप्त माहिती मिळवता आली असतीच. त्यामुळे ही गुप्तता प्रतिस्पर्धी पक्षांसाठी नव्हती. तर ती माहिती जनतेला मिळू नये व आपली बदनामी होऊ नये याच त्यामागचा हेतू होता. तसा तो नसेल व भाजपची भूमिका स्वच्छ असेल तर नरेंद्र मोदी यांनी जाहीर पत्रकार परिषद घेऊन या सर्व बाबींचा खुलासा करायला हवा. पण मोदींनी आजपर्यंत ते धैर्य दाखवलेले नाही. या सर्व प्रकरणात लखलखीत चारित्र्य दाखवणारा एकमेव पक्ष आहे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष. या योजनेखाली देणग्या घेणार नाही असे त्यांनी आरंभीच जाहीर केले होते. इतकेच नाही तर या योजनेला न्यायालयात आव्हान देणाऱ्यांमध्येही ते प्रमुख याचिकाकर्ते होते. त्यांच्याच प्रयत्नांमुळे भाजपचा हा मोठा भ्रष्टाचार जसा देशासमोर आला आहे तसाच देशातील भांडवलशाहीचा मुखवटाही फाडला गेला आहे. भाजप हा हिंदुत्वाच्या नावावर विष पसरवणारा पक्ष आहेच. पण तो कुडमुड्या भांडवलशहांना खंडणीच्या बदल्यात संरक्षण देणाराही पक्ष आहे हे लक्षात ठेवायला हवे.

विचार

# दिल्लीचे सरकार तुरुंगातून चालवणार?

**केजरीवाल यांच्या संभाव्य अटकेबाबत खबरदारीच्या व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. आम आदमी पक्षाने तर एक सर्वेक्षणही केले आहे. केजरीवाल यांना 'ईडी'ने अटक केली तर दिल्लीचे सरकार तुरुंगातून चालवता येऊ शकेल का, या शक्यतेवरही विचार करण्यात आला आहे. दिल्ली सरकारचे मंत्री आतिशी यांनी यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाऊन काम करण्याची रीतसर परवानगी घेण्याची तयारी केली आहे.**



**राही भिडे**

भ्रष्टाचाराला विरोध करत स्थापन झालेल्या आम आदमी पक्षाला गेल्या काही वर्षांपासून भ्रष्टाचाराच्या आरोपांना तोंड द्यावे लागत आहे. आतापर्यंत आठ वेळा समन्स पाठवूनही दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल अंमलबजावणी संचालनालया (ईडी) च्या चौकशीला सामोरे जाण्याचे टाळत आहेत. आपल्याला चौकशीला बोलवून अटक केली जाण्याची भीती त्यांना वाटते. 'ईडी'च्या चौकशीविरोधात आतापर्यंतचे सर्व न्यायालयीन मार्ग अनुसरल्याने आता त्यांच्यासमोर चौकशीला सामोरे जाण्याशिवाय कोणताही मार्ग उरलेला नाही. एकीकडे लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी वेगवेगळ्या पक्षांबरोबरच चर्चा, व्यूहनीती आखण्यात व्यस्त असताना दुसरीकडे 'ईडी' त्यांना चौकशीला हजर राहण्यासाठी एकामागून एक समन्स पाठवत आहे.

अलिकडेच अर्थमंत्री आतिशी यांनी दिल्ली सरकारचा अर्थसंकल्प सादर केला; पण केजरीवाल यांनी न्यायालयात हजर न राहण्यासाठी अर्थसंकल्पाचे कारण दिले होते. अर्थसंकल्पाची राजकीय रेषा केजरीवाल यांनी ठरवली असून 'रामराज्याचा अर्थसंकल्प' म्हणून त्याचा प्रचार केला जात आहे. आता मध्य प्रदेशमधील बहुचर्चीत 'लाडली योजना' दिल्लीतही दाखल झाली आहे. अर्थसंकल्पानंतर महिलांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून उत्तम आशीर्वाद मिळत असल्याचा त्यांचा दावा आहे. एकीकडे असे असताना दुसरीकडे दिल्ली दारू धोरण प्रकरणात तीन समन्स बजावूनही हजर न झाल्याने केजरीवाल यांनी समन्सकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे सांगत 'ईडी'ने त्यांच्या विरोधात न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मात्र इतक्या वेळा समन्स पाठवल्यानंतर आता कुठे त्यांच्या भूमिकेत थोडा बदल होत आहे. अर्थात दिल्लीच्या अर्थसंकल्पाचे निमित्त करून ईडीपुढे हजर न होण्याच्या कृतीतून त्यांचे लक्ष अजूनही लोकसभेच्या निवडणुकीसाठी मतांची बेगमी करण्याकडे असल्याचे लपून राहिले नाही.

केजरीवाल यांची 'लाडली योजना' एक एप्रिलपासून लागू होणार आहे. त्याआधीपासून म्हणजे जागतिक महिला दिनाचे निमित्त शोधून त्यांनी महिला सक्षमीकरणाचा गजर सुरू केला आहेच. महिलांसाठी 'सर्वात मोठी सशक्तीकरण योजना' असा या योजनेचा गवगवा सुरू आहे. तिकडे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन 'ईडी'च्या दहा समन्सनंतर हजर होण्यास तयार होते; ते 'ईडी'च्या अधिकाऱ्यांसमोर वैयक्तिकरित्या हजर झाले होते. परंतु त्यांचा अनुभव लक्षात घेऊन केजरीवाल यांनी केवळ आभासी माध्यमातून चौकशीसाठी उपलब्ध होऊ शकतो, असे कळवले असल्याचे सांगितले जाते. यापूर्वी केजरीवाल 'ईडी'शी संबंधित एका प्रकरणात न्यायालयात हजर झाले होते. मध्यंतरी केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभेत विश्वासदर्शक ठराव आणला आणि जिंकला. विश्वासदर्शक ठराव आल्यावर ते न्यायालयात येतील, असे आधी न्यायालयाला सांगण्यात आले होते. सुनावणीनंतर न्यायालयाने त्यांना १६ मार्च रोजी प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश दिले. केजरीवाल यापूर्वी न्यायालयात हजर झाले होते, त्याच पद्धतीने त्यांना 'ईडी'समोर हजर व्हायचे आहे.

आपल्या कायदेशीर सल्लागारांचे मत घेऊनच केजरीवाल यांनी हे पाऊल उचलले असणार हे उघड आहे. 'ईडी'समोर हजर झाले तर अटक होईल; त्यापेक्षा न्यायालयासमोर हजर झाले तर अधिक चांगले, असा विचार त्यांनी केला असेल. त्यावर 'ईडी'ला कोणतीही हरकत घेता येणार नाही. पण इथे १२ मार्चनंतर न्यायालयात उपस्थित राहण्याचे सांगण्यामागेही कारण आहे. ते म्हणजे तोपर्यंत लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांची नावे निश्चित करुन प्रचाराची आखणी करता येईल. आता लोकसभा निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. म्हणूनच त्यानंतर हजर झाल्यास अटक होण्याची शक्यता कमी आहे. केजरीवाल यांना अटक केली तर विरोधकांना त्यांच्या अटकेचे भांडवल करता येईल. सहाजिकच हे टाळण्याकडे एनडीएच्या सरकारचा कल असेल. ही बाब केजरीवाल यांच्या पथ्यावर पडणारी आहे. केजरीवाल यांनी 'ईडी'ने आतापर्यंत जारी केलेली सर्व समन्स बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. त्यांनी 'ईडी'ला पत्र लिहून सर्व समन्स मागे घेण्याची मागणीही केली आहे. केजरीवाल वारंवार एका बाबीचा विशेष उल्लेख करत आहेत. ती म्हणजे 'ईडी'ने त्यांना कोणत्या भूमिकेत कार्यालयात हजर राहण्यासाठी बोलावले जात आहे ते कळवलेले नाही. म्हणजेच ते आरोपी म्हणून, प्रत्यक्षदर्शी म्हणून, दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून की आम आदमी पक्षाचे प्रमुख म्हणून ईडीपुढे हजर होणार, हा प्रश्न विचारत आहेत.

केजरीवाल यांना मिळालेल्या 'ईडी' समन्सबाबत आम आदमी पक्षाचे नेतेही आपली भूमिका स्पष्ट करत आहेत. त्यांनीही केजरीवाल यांच्या अटकेची शक्यता व्यक्त केली आहे. केजरीवाल यांच्या संभाव्य अटकेबाबत खबरदारीच्या व्यवस्थेवरही सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. आम आदमी पक्षाने तर एक सर्वेक्षणही केले आहे. केजरीवाल यांना 'ईडी'ने अटक केली तर दिल्लीचे सरकार तुरुंगातून चालवता येईल का, या शक्यतेवरही विचार करण्यात आला आहे. दिल्ली सरकारच्या मंत्री आतिशी यांनी आपल्या नेत्यांना यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाऊन काम करण्याची रीतसर परवानगी घेण्यास सांगितले आहे. 'आप'चे नेते सौरभ भारद्वाज म्हणत आहेत की, 'ईडी'ची समन्स बेकायदेशीर आहेत. त्यांचा उद्देश चौकशी करण्याचा नसून केजरीवाल यांना अटक करण्याचा आहे. भारद्वाज आणि त्यांचे सहकारी नेते याचाच पुनरुच्चार करत म्हणतात की, केजरीवाल यांना अटक झाली तर ते तुरुंगातून सरकार चालवतील. आठ समन्सनंतर केजरीवाल यांनी आभासी माध्यमातून हजर राहण्याचे मान्य केले असले तरी आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांना हजर राहण्याबाबत कालहरण करायचे आहे. समन्सबाबत आम आदमी पक्षाने यापूर्वीच म्हटले आहे की, 'ईडी' ने एकामागून एक समन्स पाठवण्याऐवजी न्यायालयाच्या निर्णयाची वाट पाहायला हवी होती. आठवे समन्स पाठवताना 'ईडी'ने केजरीवाल यांचा युक्तिवाद फेटाळून लावला होता आणि हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे नाकारले होते. या प्रकरणाची सुनावणी न्यायालयात होणार असून केजरीवाल यांना प्रत्यक्ष हजर राहावे लागेल, असे न्यायालयाचे आदेश आहेत.

एव्हाना दिल्ली सरकारचा अर्थसंकल्पही मंजूर झाला आहे. त्यामुळे आता केजरीवाल यांच्याकडे देण्यासारखे कोणतेही कारण नाही. 'ईडी'ने एक दिवसानंतर आभासी चौकशी करण्यास सहमती दर्शवली आणि न्यायालयाप्रमाणे दुसऱ्या दिवशी वैयक्तिक हजर राहण्याची तारीख दिली तर काय, या प्रश्नांच्या उत्तरांवर केजरीवाल यांच्या अटकेची शक्यता अवलंबून आहे. केजरीवाल आणखी काही कायदेशीर मार्ग शोधत आहेत. 'ईडी'चे अधिकारी पुढील सुनावणीपूर्वी केजरीवाल यांना अटक करू इच्छितात का, आभासी स्वरूप त्यांना अटकेपासून वाचवेल का? असे प्रश्न अनुत्तरीत आहेत. 'ईडी'चा खरा उद्देश केजरीवाल यांना अटक करणे हा असून चौकशी हे केवळ एक निमित्त आहे. सोरेन यांच्या केसवर नजर टाकली तर ही शंका खरी ठरते. इथे लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे न्यायालयीन हजेरी आणि तपास यंत्रणेने केलेली चौकशी या दोन्हींमध्ये मोठा फरक असतो. अर्थमंत्री आतिशी यांनी काही दिवसांपूर्वी 'ईडी'वर चौकशीचे फुटेज हटवल्याचा आरोप केला होता. 'ईडी'ला त्यावर स्पष्टीकरण द्यावे लागले आणि नंतर त्यांच्याकडून हे आरोप फेटाळण्यात आले. केजरीवाल यांची चौकशी आभासी पद्धतीने झाली तर कोणी फुटेज हटवू शकत नाही. केजरीवाल यांनाही नेमके तेच हवे आहे; पण केजरीवाल यांनी हे सर्व 'ईडी'ला सांगितल्याने काहीही फरक पडणार नाही. त्यांनी न्यायालयाकडे ही मागणी केली तरच सर्व शक्य आहे. थोडक्यात, न्यायालयाने ती मान्य केली, तरच त्यांचा उद्देश साध्य होईल.

आजकाल

# हरियाणा- भाजप आणि चौटालांचे ताटातुटीचे नाटक

एक मुख्य मंत्री पदावरून दूर होणे, नवा मुख्य मंत्री येणे, त्यानंतर त्या नेत्याची शक्ती परीक्षा होणे आणि त्याने त्यात 'उत्तीर्ण' होणे. जेमतेम दीड दिवसांत हरयानात नाट्यपूर्ण घडामोडी घडल्या. किती मतांनी विश्वास ठराव जिंकला हे दुय्यम आहे. भाजपची सत्ता शाबूत राहिली, त्याहीपेक्षा पक्षाचे बहुमत सिद्ध झाले हे त्या पक्षासाठी महत्त्वाचे. भारतीय राजकारणात मित्र पक्ष किती बेभरवशाचे असतात हे पुन्हा एकदा दिसले. आमदारांनी वैयक्तिक पातळीवर पक्षादेश न जुमानणे आणि सत्तेशी जवळीक साधणे याचेही उदाहरण दिसले. हरयाना या राज्यात भारतीय जनता पक्ष मित्र पक्षाच्या मदतीने सत्तेत होता. त्यांच्या सत्तेला वरवर पाहता धोका दिसत नव्हता. तरीही तेथील मुख्यमंत्री अचानक बदलण्यात आले. नव्या चेहेऱ्यांना व नेत्यांना संधी देण्याच्या धोरणानुसार मनोहरलाल खट्टर यांच्या ऐवजी नायब सिंग सैनी यांना आणल्याचे भाजप सांगत आहे; पण आगामी लोकसभा आणि नंतर राज्यात होणारी विधानसभा निवडणूक यांची पार्श्वभूमी या नेता बदलाला आहे हे नक्की. जननायक जनता पक्षाचे दुष्यंत चौटाला यांच्या राजकीय भविष्यावर मात्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**मित्राची गरज संपली**

गेल्या विधानसभा निवडणुकीत ४१ जागा जिंकून भाजप विधानसभेतील मोठा पक्ष ठरला; पण बहुमतापासून दूर राहिला. दहा आमदार असलेल्या दुष्यंत चौटाला यांच्या जननायक जनता पक्षाने त्यांना पाठिंबा देऊ केला. या मदतीच्या बदल्यात दुष्यंत यांना उपमुख्यमंत्रिपद मिळाले. त्यांच्या दोन आमदारांना मंत्रिपदेही मिळाली. त्यानंतर दुष्यंत यांची महत्त्वाकांक्षा वाढली. २०१४ मध्ये ते हिस्सारमधून लोकसभेवर निवडून गेले होते. या शहराचे रूपांतर ते हवाई वाहतूक केंद्रात करू लागले. त्याद्वारे दुष्यंत जास्त प्रकाशझोत खेचत आहेत, अशी भाजपची भावना झाली. राज्यातील नागरिकांना खासगी क्षेत्रात ७५ टक्के आरक्षण द्यावे ही कल्पना त्यांची. खट्टर सरकारने तसा कायदा केला, पण उच्च न्यायालयाने तो रद्द ठरवला.

पंचायत राज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याची त्यांची कल्पनाही सरकारने राबवली, मात्र त्याचे श्रेय दुष्यंत घेत होते. यामुळे भाजपचे वरिष्ठ नेते नाराज झाले. आपल्या क्षम तेविषयी दुष्यंत यांचा गैरसमज झाला व त्यांनी गेल्या वर्षी राजस्तानात विधानसभा निवडणुकीत १९ उमेदवार उभे केले. त्यापैकी १८ जणांची अनामत रक्कम जप्त झाली. या सर्व उमेदवारांना १६० ते १२०० मते मिळाली होती, असे असूनही येत्या लोकसभा निवडणुकीत आपल्या पक्षाला दोन जागा देण्याचा आग्रह दुष्यंत यांनी धरला होता. राजस्तानात व हरयानात त्यांची शक्ती किती आहे याचा अंदाज आल्याने भाजपने त्यांची साथ सोडण्याचा निर्णय घेतला होता. गेल्या २९ फेब्रुवारी रोजी राज्यातील सर्व दहा लोकसभा मतदारसंघांसाठी भाजपने उमेदवार निश्चित केले. त्याच बैठकीत जननायक जनता पक्षाला निरोप देण्यावर शिक्कामोर्तब झाले. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी ४०० जागा जिंकेल, असा दावा भाजपतर्फे करण्यात येत आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यात नवे मित्रपक्ष शोधत आहे किंवा जुन्यांना परत बोलवत आहे, असे असूनही 'जेजेपी'ची साथ त्यांनी सोडली. मित्रपक्ष आपल्यापेक्षा मोठा झालेला भाजपला चालत नाही याचे हे आणखी एक उदाहरण. हिस्सारचे भाजपचे खासदार ब्रिजेंद्र सिंग नुकतेच काँग्रेसमध्ये गेले आहेत, तरीही राज्यातील लोकसभेच्या सर्व जागा जिंकण्याचा भाजपला विश्वास वाटत आहे.

मात्र, विधानसभेच्या निवडणुकीबाबत राज्यातील पक्ष थोडा चिंतेत नक्कीच आहे. महिला कुस्तीगिरांचे आंदोलन, शेतकऱ्यांचे आंदोलन यांचा परिणाम मतदानावर होऊ शकतो, असे भाजपमधीलच काही जणांना वाटत आहे. आपला पक्ष व आमदार सांभाळणे हे दुष्यंत यांच्या पुढील आव्हान आहे. सत्तेसाठी त्यांचे सहाजण भाजपच्या छावणीत गेले आहेत. त्यांनी पक्षादेश जुमानलेला नाही. मित्राची साथ नसली तरी मुख्य मंत्र्याचा चेहेरा बदलून भाजपने सध्या राज्य राखले आहे.

लोकसंसद

## भारतीय प्रवाशांचे रेल्वे प्रवासाला प्राध्यान्य

अलिकडे रेल्वे प्रशासनाने अनेक नवीन रेल्वे बऱ्याच ठिकाणी सुरु केल्या आहेत. नवीन प्रकल्प रेल्वेनी जोडले जात आहेत. गुजरात मधील युनिटी ऑफ स्टॅचू असो की अयोध्या येथील राम मंदिर असो... या ठिकाणी भारतातल्या अनेक शहरामधून जाण्याची सोय उपलब्ध होत आहेत, अनेक प्रवाशी सुद्धा रेल्वे प्रवासाला प्राधान्य देत आहेत. २०२३-२०२४ मध्ये रेल्वेने एकूण महसूल २. ४० लाख कोटी एवढा मिळविला आहे. मागील वर्षी १५ मार्चपर्यंत हा आकडा २. २३ लाख कोटी रुपये एवढा होता. याचाच अर्थ रेल्वेच्या उत्पन्नात १७ हजार कोटी रुपयांची भर पडली आहे. प्रवाशी संख्या सुद्धा विक्रमी आहे. २०२३-२०२४ मध्ये आत्तापर्यंत ६४८ कोटी प्रवासांनी प्रवास केला आहे. गेल्या वर्षी हा आकडा ५९६ कोटी एवढा होता. त्यामुळे तब्बल ५२ कोटी प्रवाशी वाढले आहेत असे अनुमान निघू शकते. अनेक रेल्वे स्टेशनचे नूतनीकरण करण्यात येत आहे. याबरोबरच रेल्वे मध्ये गाड्या वेळेवर कशा धावतील हे सुद्धा पाहिले जाते नुकतीच काही ठिकाणी सुरु केलेली वंदे भारत ही ट्रेन प्रवाशी आकर्षित करत आहेत. रेल्वेने मालवाहतूक सुद्धा विक्रमी केली आहे. १८५३ साली रेल्वे भारतात प्रथम सुरु झाली. त्या घटनेला आता १७१ वर्षे झाली आहेत. भारतीय रेल्वे प्रवाशांना वरदान आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

मराठी साहित्यिक दिनविशेष

### वीस मार्च

**१९०९:-** आयुर्वेदाविषयक ग्रंथकर्ते आणि प्रकाशक शंकर दाजीशास्त्री पदे यांचा जन्म. 'चरकसंहित भाग १ ते १४', 'वनौषधीगुणादर्श भाग १ ते ७', 'सुबोध वैद्यक', 'रसवैद्य', 'बृहन्निघंटु','औषधी बाड' यासारखे आयुर्वेदिक तर 'सुंदराबाई' ही कादंबरी व 'प्रेमशिक्षक' ही नाटिका मिळून २२ ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९११:-** साहित्यिक आणि समीक्षक माधव मनोहर (मूळ आडनाव वैद्य) यांचा जन्म. नाट्यसमीक्षक म्हणून त्यांनी मोठी कामगिरी केली, त्या निवडक लेखांचे 'पंचम वेध' हे पुस्तक कमलाकर नाडकर्णी यांनी संपादित केले. रुपांतरीत एकांकिका व नाटके, तीन कादंबऱ्या हे त्यांचे अन्य साहित्य. **१९२०:-** चरित्रकार, भाषांतरकार रामकृष्ण वासुदेव बर्वे यांचे निधन. बर्वे यांनी भा. वी. फडके यांच्या सहकार्याने 'श्रीमत् परमहंस स्वामी' यांचे चरित्र तीन भागात लिहिले व 'श्रीमत् परमहंस स्वामी रामतीर्थ यांचे समग्र ग्रंथ पत्रव्यवहार भाग १-१२' संपादित केले. याशिवाय महर्षी श्रीवाल्मिकीप्रणीत योगवसिष्ठ या ग्रंथाचे मराठी भाषांतर त्यांच्या नावावर आहे. **१९२२:-** ख्यातनाम मराठी नाटककार वसंत कानेटकर यांचा जन्म. कथा, कादंबरी, समीक्षक, आत्मचरित्रकार अशी साहित्यिक लीला साधणारे कानेटकर गाजले ते नाटककार म्हणून. 'वेड्याचे घर उन्हात' या पहिल्याच नाटकाने त्यांना लोकप्रियता मिळवून दिली. तथापि, 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक त्यांच्या नाट्यप्रवासाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरले. यानंतर शहाजीराजांवर 'तुझा तू वाढवी राजा', संभाजीवर 'इथे ओशाळला मृत्यू', महाराणी ताराराणीवर 'जिथे गवताला भाले फुटतात' या नाटकांमुळे ऐतिहासिक नाटककार अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली. याशिवाय प्रायोगिक रंगभुमीवरील 'मत्स्य गंगा', 'मीरा मधुरा', 'नल दमयंती', 'गगनभेदी' मिळून ४० नाटके त्यांनी लिहिली. 'कर्मयोगी शोकांतिका' या शीर्षकाखाली चरित्र नाटकांचा फॉर्स त्यांनी वेगळ्याच तऱ्हेने हाताळला. 'अश्रुंची झाली फुले' हे एक त्यांचे गाजलेले नाटक. नाटकाव्यतिरिक्त 'पंख', 'पोरका' या कादंबऱ्या, 'नाटक एक चिंतन' ही समीक्षा. १० कादंबऱ्या, ४ कथासंग्रह, 'मी....मायापाशी' हे आत्मचरित्र आणि त्यांचे शेवटचे पुस्तक 'शिवशाहीचा शोध' हे ही गाजले. **१९३१:-** कवी, कथा, कादंबरी आदी ललित लेखक उमाकांत कृष्ण कीर यांचा जन्म. 'निळेशार क्षितिज' या राज्यशासन पुरस्कार प्राप्त पुस्तकाशिवाय 'गोपीनाथाचं तळ' आणि 'चंद्रदंशाची जखम' ह्या लघुकादंबरी तसेच 'रतन अबोली', 'श्यामकविता', 'भावलं तसं लिहिलं', 'हे सारस्वतांचे झाड', 'डायरीतील काही पाने', 'प्रस्थान' काही कविता 'अशाही' ह्या पुस्तकांशिवाय नवाकाळ, नवशक्ती, सामना या दैनिकातून सहसंपादकाची जबाबदारी पार पाडली. **१९३५:-** लेखक सीताराम हौसाजी धरुवाडीकर यांचा जन्म. ह्यांचा 'चरक' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला आहे. **१९३५:-** विविध वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिक, दिवाळी अंकातून कथा, लेख, अध्यात्मपर लेख, कविता, बालकविता लिहिणाऱ्या लेखिका श्रीमती प्रतिभा प्रभाकर गारवटकर यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'वावटळ' ही ग्रामीण कथासंग्रह, 'प्रभा' आणि 'श्रावणसरी' हे बालकवितासंग्रह, याशिवाय 'गमाडी गंमत' ही बालनाटिका, तसेच मार्टिन ल्यूथर किंग (ज्युनिअरचे) चरित्र आणि 'श्रीसमर्थ रामदास जीवन काव्य' हा कविता संगीतबध्द काव्यसंग्रह अशी साहित्यसंपदा. 'इंद्रधनू' हा काव्यसंग्रह आणि 'ठिंगू आणि इतर गोष्टी' हा बालकथासंग्रह लवकरच प्रसिध्द होणार आहे. **१९४०:-** कवी मधुकर श्रावण पाटील तथा मधू कधोडकर यांचा जन्म. 'चिमुकले आभाळ' या बालगीतासह 'रश्मीबंध', 'मधुवंती' हा काव्यसंग्रह प्रकाशित याशिवाय नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन द्वारे कथा, कविता, बालनाटय, रुपक प्रसारित व प्रकाशित. **१९४१:-** लेखक श्रीराम रघुनाथ नातू यांचा जन्म. ह्यांनी वृत्तपत्रातून विज्ञान विषयक तसेच ग्रंथालयशास्त्र विषयक स्फूट स्वरुपाचे लेखन केले आहे. 'सर्वांसाठी ग्रंथालये' या ग्रंथासह त्यांची 'साहसी टॉम' ही कादंबरी मार्क ट्वेन यांच्या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद आहे. **१९४६:-** नामवंत वक्ते, प्रसिध्द कवी, कथाकार, समीक्षक, ललित गद्यकार, अनुवादक, संपादक, गझलकार व स्तंभलेखक वसंत केशव तथा व्ही के पाटील यांचा जन्म. 'छप्पर','सहीम ागचा माणूस' हा कथासंग्रह. 'कंदीलाचा उजेड' हे ललित, 'अहितात नवल' आणि इतर कविता हा काव्यसंग्रह. 'पंखफुटीचे दिवस', 'एका पुस्तकाचा पाठलाग' या पुस्तकांसह आठ अनुवादीत पुस्तके, सतरा पुस्तकांचे सहलेखक आणि यशवंतराव विचार आणि वारसाचे संपादक अशी साहित्य संपदा. **१९४८:-** लेखक, पत्रकार रवींद्र शंकर दप्तरदार यांचा जन्म. ह्यांनी साखर कारखान्यातील राजकारणावर 'साखर पेरणी' हा ग्रंथ लिहिला आहे. **१९५०:-** भाषांतरकार आणि व्यायाम या विषयावर अधिकारवाणीने लेखक करणारे शंकर गोपाळ डोंगरे यांचे निधन. 'व्यायाम' ह्या मासिकातून सातत्याने लेखन करणाऱ्या डोंगऱ्यांनी 'कसा होतो, व कसा झालो' ह्या आत्मचरित्रासह गुरुवर्य बाळंभट दादा देवधर यांचे चरित्र. 'एक रुपांतरीत कादंबरी' हे पुस्तक तसेच 'व्यायाम-ज्ञानकोश' च्या रचनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. **१९५१:-** कविमंडन, डॉ. विजय जनार्दन यांचा जन्म. नियतकालिकांतून ललित लेखनाशिवाय अर्थ शास्त्रीय पाठयपुस्तकांचे लेखन, त्यामध्ये 'अर्थनीति आणि आर्थिक नियोजन', 'भारताचा आर्थिक विकास व नियोजन', 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन' ही पाठयपुस्तके आणि 'श्री क्षेत्र रेसकोर्स' हे काव्य अशी साहित्य संपदा.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० मार्च

१) श्री. नंदकुमार जगन्नाथ म्हात्रे चेंढरे-अलिबाग, २०-३-१९४४

२) श्री.गोरखनाथ कृष्णा गोवा विद्यानगर, २०-३-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# दुधाची उकळी थंडावली

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

**राज्यात दुध उत्पादनाला एकीकडे चालना दिली जात असतानाच दुसरीकडे ४० वर्षे जुन्या आरेच्या डेअरीत दुध संकलन व पिशवी बंद दुध विक्री पूर्णपणे बंद झाली आहे. यामुळे रायगडातील शेतकऱ्यांचा शेतीपूरक व्यवसाय बंद झाला आहे. तसेच, शासनाच्या खोपोली येथील आरे दुध डेअरीमधील काही मशीनरी व भंगाराची विक्री करण्यात आली असून, ही दुध डेअरी फक्त वास्तूरुपात उभी आहे. इमारत पूर्ण जिर्ण झाल्याने कोसळण्याच्या स्थितीत उभी आहे.**



महाराष्ट्रात दोन कोटी लिटरपेक्षा जास्त दुधाचे उत्पादन होते. मात्र, रायगडात दुध व्यवसायाला घरघर लागल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात १३४ दुध संस्थांसह दोन दुध संघांच्या केंद्राचे शटर मागील काही महिन्यांपासून बंद झाले आहेत. पनवेल व पेण तालुक्यातील प्रत्येकी १ असे २ जिल्हा दुध संघ दिवाळखोरीत, तर खालापुरातील ५, रोहा ८, अलिबाग ५, उरण ४, पेण १०, पनवेल १९, कर्जत १५, सुधागड २०, मुरुड २, माणगाव १०, महाड २६, म्हसळा १ आणि पोलादपुरातील ९ दुध संस्था बंद झाल्या आहेत. जिल्ह्यात २१ दुध संस्थापैकी कर्जत ३, खालापूर १, माणगाव १, रोहा ३, पाली-सुधागड ७, पनवेल १, पेण १, अलिबाग २, महाड २ अश्या दुध संस्था सुरु असून फक्त नऊ संस्था दुध संकलनात क्रियाशील आहेत. या संस्थाही

### जुन्या मशिनरी भंगाराच्या भावात

शेवटची घटका मोजत आहेत. शासनाने प्रत्येक जिल्ह्यातील वाढीव दुधाची मागणी पूर्ण करता यावी आणि घटलेल्या दुधाळ जनावरांच्या संख्येतही वाढ व्हावी यासाठी एकात्मिक दुग्धशाळाविकास उपवन प्रकल्पांतर्गत दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यात दोन प्रकल्प राबविण्याचा घेतलेला निर्णय जिल्ह्यात सध्या कुठे आहे, याच्या शोधात नागरिक आहेत.

दरम्यान, महाराष्ट्रातील ५४ दुध डेअरींमधून संभाजीनगर येथील ठेकेदाराने भंगार काढण्याचा ठेका घेतला असून खोपोली डेअरीमधील भंगार १० दिवसांपूर्वी काढण्यात आले. आता फक्त काही मशिनरी शाबूत असून मागील वर्षभरापासून उत्पादन बंद असल्याने भंगाराच्या भावात जाण्याच्या स्थितीत आहेत.

## चिकणे यांचा होणार विशेष सन्मान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमधील तत्कालिन कारागृह अधिक्षक सचिन चिकणे यांचा विशेष सन्मान होणार आहे. उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांना राज्य कारागृह अप्पर पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे.



सचिन चिकणे यांनी कारागृह अधिकारी म्हणून १९ वर्षे सेवा केली आहे. २०१६ ते २०१७ च्या दरम्यान त्यांनी अलिबागमधील जिल्हा कारागृह अधिक्षक म्हणून सेवा केली आहे. कारागृहाच्या सुरक्षेच्या दृष्टीने नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत निधीसाठी पाठपुरावा करून ४३ सीसीटीव्ही कॅमेरे त्यांनी कारागृहाच्या आवारात बसवून घेतले.

कैद्यांसाठी गांधी परीक्षा घेण्यात आली. आरोग्य शिबिराबरोबरच कैद्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी योग वर्ग तसेच कैद्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी कारागृहात वाचनालय सुरु केले होते.

दहशतवादी हल्लेखोर कसाबला मुंबईतील आर्थररोड मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले होते. त्यावेळी त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम चिकणे यांनी अठरा महिने सक्षमपणे बजावले. त्यांच्या अथक प्रयत्नाने कल्याण - डोंबिवली महापालिकेकडून कल्याण कारागृहासाठी १४ एकर जागा मिळवली. सध्या नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहातील उपअधीक्षक ते म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत त्यांना महासंचालकाकडून सन्मानित केले जाणार आहे.

## दिव्यांगांना जीवनोपयोगी साहित्यांचे वाटप



**। कोर्लई । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील खानाव पंचायतीतर्फे प्रथमच दिव्यांगांसाठी आयोजित कार्यक्रमात सरपंच अजय नाईक व निलेश गायकर यांच्या हस्ते पाच टक्के निधीतून जीवनोपयोगी विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी दिव्यांगांना वॉटरप्युरिफायर, कुलर, व्हीलचेअर, कमोड, फॅन आदी जीवनोपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले. याचा ६४ लाभार्थींना लाभ मिळाला. याप्रसंगी संदेश पडवळ, निधी पाटील, सुचिता म्हात्रे, महेंद्र म्हात्रे, विजय गायकर, संदेश शिंदे, अनिकेत नाईक, नारायण शिंदे, सुरेश धसाडे, रामदास शिंदे, दक्षता पाटील, अनंत म्हात्रे, आनंद शिंदे, गोपाळ शिंदे, शैलेश नाईक यांसह दिव्यांग लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निशांत पाटील यांनी केले.

# सोशल मीडियावर तापले निवडणुकीचे रणांगण

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

निवडणूक आयोगाने लोकसभेची निवडणूक तारीख जाहीर केल्यानंतर फेसबुक, व्हाटसअ‍ॅप या सोशल मीडियावर लोकसभा निवडणुकीचे रणसंग्राम तापू लागले आहे. सर्वांची करमणूक होत असली तरी निवडणूक जवळ येईपर्यंत अ‍ॅडमिनचे धक-धक तेवढेच वाढू लागले आहे. सोशल मिडीयावर आचारसंहिता नसली तरी लोकसभा निवडणुकीच्या तयारी प्रत्येक इच्छुक उमेदवार करू लागला आहे. सोशल मिडियावर प्रत्येक विद्यमान लोकप्रतिनिधी, विरोधक, इच्छुक उमेदवार यांच्या कार्यकर्त्यांनी सोशल मिडियाचा पुरेपुर वापर करायला सुरू केले




आहे. एखाद्या गटाच्या निष्ठावंताने दुसऱ्या गटात प्रवेश केला. त्याला मोठा धक्का बसला आहे. या मतदार संघाचा भावी खासदार कोण असेल, याचा एक्झीट पोल घेण्यासाठी सोशल मीडियाचा वापर होतो. यामध्ये ज्या गटाचा कार्यकर्ता एक्झीट पोल घेतो त्या गटाचे कार्यकर्ते आपल्या नेत्याला पसंती देतात, त्यामुळे हा एक्झीट पोलदेखील बोलाचीच कढी बोलाचाच भात ठरू लागली आहे.

निवडणूक जशी जवळ येईल तसे तरूण मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या वाढदिवसाचे महत्व देखील वाढू लागले आहे. नेते व नेत्यांची मुले, नातेवाईक, युवानेते वाढदिवस, क्रिकेटच्या सामन्यांना हजेरी लावत आहेत. त्यामुळे गावात कार्यकर्त्यांच्या मागे किती लोक जमा आहेत, प्रत्यक्षात निवडणुकीत कितीजण राहणार, या सर्व कार्यक्रमाचा फार्स सोशल मीडियावर आहे. या निवडणूका डोळयासमोर ठेवून सामाजिक बांधिलकीची समाज उपयोगी कामेदेखील मोठ्या प्रमाणात होत असल्याचे सोशल मीडियावर अनेक ग्रुपवर पहायला मिळत आहे.

प्रत्येक गटाचा कार्यकर्ता आपल्या नेत्याच्या कार्याची किंवा समारंभाची माहिती सोशल मीडियावर टाकतो. त्याला समर्थक उत्तर देणारी पोस्ट विरोधी गटाचा कार्यकर्ता टाकत असतो. त्यामुळे निवडणुकीपुर्वीच सोशल मीडियावर लोकसभा निवडणुकीसाठी सर्वत्र रणांगण तापत असल्याचे दिसत आहे. निवडणूकीचा निकाल फिरवणे तरुणांच्या हातात आहे.

त्यामुळे सोशल मीडियावर होणारी चर्चादेखील निवडणुकीत कलाटणी देणारी ठरू लागली आहे.

## सोनी कापसे यांचे निधन

**। गोवे-कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील मुठवली येथील रहिवासी सोनी शांताराम कापसे यांचे बुधवारी (दि.१३) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्षाचे होते. त्या मुठवली



येथील रहिवाशी असून गोवे येथील त्यांच्या मुलीकडे राहत होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यविधीसाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, व शैक्षणिक तसेच समस्त मुठवली ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, मुलगी, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.२२) तर उत्तरकार्य विधी शनिवारी (दि.२३) त्यांच्या मुठवली येथील निवासस्थानी होणार आहेत.

## उदय मोरे यांना श्रद्धांजली

**। खांब । वार्ताहर ।**

१९९३ पासून मेढे सारख्या ग्रामीण भागातून पत्रकारितेला सुरूवात करणारे उदय मोरे यांनी आपल्या लेखनीतून ग्रामीण जीवनातील विविध समस्यांना नेहमीच वाचा फोडून अनेकांना न्याय मिळवून दिला. अवचितगड प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक कार्याचे दालन खुले करून अनेकांना मदतीचा हात पुढे केला. त्यांच्या निधनाबद्दल समाजातील विविध स्तरांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे. तर, रोहा प्रेस क्लबच्यावतीने त्यांना प्रेस क्लबच्या संपन्न झालेल्या सभेमध्ये श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

रायगड भूषण पुरस्कार प्राप्त पत्रकार उदय मोरे यांच्या निधनाने पत्रकारितेमधील एक तळपता सूर्य मावळला असल्याची भावना सम ाजमनातून व्यक्त होत आहे. यावेळी मिलिंद आष्टीवकर, अरुण करंबे, राजेंद्र जाधव, सुहास खरीवले, नंदकुमार मरवडे, उद्धव आव्हाड, विश्वजीत लुमन, शरद जाधव, रविंद्र कान्हेकर, सागर जैन, केशव म्हस्के आदी उपस्थित होते.



# साई भजन मंडळ ठरले मानकरी




**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था रजि. आयोजित नवविधा भक्ती सेवा समिती हार्बर लाईन संलग्न श्री छत्रपती शिवराय भजन मंडळ वाशी, श्री संत तुकाराम महाराज रेल्वे प्रवासी भजन मंडळ वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने संयोजित भक्ती शक्ती रेल्वे प्रवासी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी (दि.१७) सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत वाशी रेल्वे स्टेशनजवळील साई हेरिटेज हॉल येथे भजन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत २६ रेल्वे प्रवासी भजन मंडळे सहभागी झाली होती. यावेळी साई भजन मंडळ डोंबिवली या मंडळाला दशरथ भगत यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

याप्रसंगी विनय विचारे, सचीन बेलकर, राकेश गायकवाड, किरण चव्हाण, प्रवीण मेढेकर, विजय वर्दम, उमेश घरवे, श्रीकांत रामाने, दीपक कांबळे, सुधीर सावंत आदी उपस्थित होते.

## माणगावात बीज सोहळ्याचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाच्यावतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही सर्व सांप्रदाय भक्तांच्या सहकार्याने तमाम वारकरी सांप्रदायिक भक्त मंडळींच्या उपस्थितीत जगद्गुरू श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज बीज सोहळा बुधवारी (दि.२७) कुणबी भवन येथे साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यात भक्तगण स्त्री-पुरुषांनी व समाज बांधवानी सहभागी होऊन सुखांनद घ्यावा, अशी विनंती बीज सोहळा संस्थापक महादेवराव बक्कम, रामभाऊ टेंबे, मुरकर महाराज यांनी केली आहे. यादिवशी सकाळी ७ वाजता मूर्तीचे पूजन, ९ ते ११ यावेळेत आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतखोल विद्यार्थ्यांचे संत तुकाराम महाराज यांच्या जीवनावर वाक स्पर्धा, ११ ते १२ दरम्यान जयराम खाडे यांचे कीर्तन, दुपारी १ ते ३ यावेळेत माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळातर्फे महाप्रसाद असे दिवसभर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## विजय म्हात्रे यांची शोकसभा

**। गडब । वार्ताहर ।**

छत्रपती पुरस्कार विजेते कबड्डी खेळाडू विजय म्हात्रे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने शोकसभेचे आयोजन ना.ना. पाटील हायस्कुल पेझारी येथे करण्यात आले होते.

यावेळी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष हिराचंद पाटील, छत्रपती पुरस्कार विजेते संजय म्हात्रे, जनार्दन पाटील, प्रथमेश पाटील, सुमित माने, मिलिंद पाटील आदिंसह कबड्डी पंच, खेळाडू उपस्थित होते.

कबड्डी क्षेत्रात गुरुजी नावाने संबोधले जाणारे विजय म्हात्रे कबड्डीतील अभेद्य भिंत होते. ते महाराष्ट्र संघाचे तिन वेळा कर्णधार होते. शिस्तप्रिय खेळाडू म्हणून त्यांची ख्याती होती. विजय म्हात्रे कबड्डीतील महापुरुष होते. त्यांचा आदर्श नवोदित खेळांडूंनी घ्यावा. तसेच, कबड्डीचा आधारवड हरपला असल्याच्या भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त करुन विजय म्हात्रे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.




## वाळीत प्रकरण अनिर्णित

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील भोस्ते गावातील वाळीत प्रकरणात तालुका प्रशासनाने निर्णय देण्याची घटना घडली आहे. भोस्ते गावातील काही कुटुंब वाळीत असल्याबाबत वर्तमानपत्रांमधून बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. तसेच, त्या ठिकाणी वाळीत असलेल्या काही महिलांनी याप्रकरणी पोलिसांकडे अर्ज दाखल केले होते. त्या अनुषंगाने श्रीवर्धन तहसील कार्यालयात श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांनी बैठक बोलावली होती.

बैठकीमध्ये सुतार समाजातील वाळीत टाकलेल्या घरांना गावामध्ये समाविष्ट करून घेण्याबाबत समझोता झाला. परंतु, कुणबी समाजातील चार घरे वाळीत असल्याबाबत माहिती असूनसुद्धा या लोकांबाबत कोणताही निर्णय प्रशासनाने दिलेला नाही. या गावातील कुणबी समाजातील चार घरे देखील त्या ठिकाणच्या ग्रामस्थ मंडळाने वाळीत टाकलेली आहेत. या कुटुंबांच्या वतीने या बैठकीमध्ये अर्ज देखील स्वीकारण्यास नकार देण्यात आला. बाकी वाळीत कुटुंबांचा निर्णय लागल्यानंतर सुद्धा चार घरांच्या बाबतीत प्रशासनाने निर्णय का दिला नाही, हा प्रश्न मात्र गुलदस्त्यात आहे. या चार घरांबाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय न घेतल्यास चार वाळीत कुटुंब रायगडचे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे विश्वसनीय वृत्त प्राप्त झाले आहे.

## वाचनप्रेमी महिलेमुळे घर सुसंस्कृत

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

घरातील महिलेने वाचन केले तर संपूर्ण घरातील सदस्य वाचन संस्कृतीचे भाग बनतात. घरातील मुले सुसंस्कृत बनतात, असे उद्गार 'वाचन संस्कृती आणि आजची महिला' यावर उपस्थितांना मार्गदर्शन करताना स्वाती वालावलकर यांनी काढले. वेतोरे येथील श्री देवी सातेरी वाचनालयाच्या वतीने आयोजित महिला सन्मान सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या.

यावेळी सुजाता चमणकर व अनिता वेतूरकर यांना वाचनालयाचा जीवन गौरव पुरस्काराने, तर कांचन गावडे व पूजा धुरी यांना कर्तुत्ववान महिला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, या सन्मान सोहळ्यात सुजाता चम णकर व अनिता वेतूरकर यांना 'श्री देवी सातेरी वाचनालय जीवन गौरव पुरस्कार २०२४' प्रदान करण्यात आला.

आदर्श बालवाडी पुरस्कार प्राप्त कांचन दामले व संपूर्ण महाराष्ट्रामधून दिव्यांग विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या पूजा धुरी यांना कर्तृत्ववान महिला पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## लोहार बांधवांना वस्तूंचे वाटप



**। चिरनेर । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील जासई ग्राम पंचायतीच्यावतीने शुक्रवारी (दि.१५) १५% निधीतून लोहार समाज बांधवाना विविध प्रकारच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.

मुलांच्या शिक्षणासाठी आणि महिलांना आपल्या प्रपंचात हातभार लावता यावा, मिळणाऱ्या चार पैशांतून महिला सक्षम व्हाव्यात या दृष्टीकोनातून त्यांना शिलाई मशीन, घरघंटी व इतर वस्तूंचे वाटप करण्यात आले. या कामासाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी उरण तालुका कार्यकारी मंडळाने विशेष परिश्रम घेतले. तसेच, जासई शेकापचे सरपंच संतोष घरत, उपसरपंच माही पाटील, सर्व सदस्य, ग्रामसेवक भास्कर पालकर या सर्वांचे मोठे योगदान आहे.

# कुठे नेऊन ठेवले आहे माथेरानला!

### विकासकामांत करोडो रुपयांचा चुराडा

***। माथेरान । वार्ताहर ।***

***रायगड जिल्ह्यातील माथेरान या पर्यटनस्थळासाठी आजवरच्या कार्यकाळात करोडोंचा निधी उपलब्ध झाला होता. याच निधीच्या माध्यमातून हे नयनरम्य पर्यटनस्थळ विकसनशील होणे अपेक्षित होते. परंतु, आलेल्या निधीचा सदुपयोग न केल्यामुळेच आजही केलेली बहुतांश कामे अत्यंत निकृष्ट झालेली आहेत. तर काही कामे अल्पावधीतच उपयोगाविना पडून आहेत.***



*काही वर्षांपूर्वी जवळपास १२५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. यामध्ये नेरळ माथेरान घाटरस्ता, माथेरानचा मुख्य रस्ता आणि महत्वाच्या पॉईंट्सच्या सुशोभीकरणासाठी खर्च करण्यात आला होता. मुख्यत्वे जी काही लोकाभिमुख पर्यटकांना सेवासुविधा निर्माण करणारी कामे होती त्याकडे नगरपरिषदेच्या माध्यमातून करडी नजर ठेवून सर्व कामे उत्तम दर्जाची करून घेणे अपेक्षित होते. परंतु संबंधित अधिकारी वर्गाने ठेकेदाराच्या आणि स्वतःच्या फायद्यासाठी हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्यामुळे बहुतांश कामे तकलादू झालेली आहेत.*

*पर्यटकांसाठी एक नाविन्यपूर्ण आकाशगंगा प्रकल्प उभयारण्यात आला होता. तो सुध्दा मागील पाच ते सहा वर्षांपासून बंद आहे. पावसाळ्यात महत्त्वाच्या भागात मातीची धूप होऊ नये यासाठी धूप प्रतिबंधक जाळ्या बसविण्यात आल्या होत्या. त्या जाळ्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या असल्यामुळे या कामावर सुध्दा लाखो रुपये खर्च करण्यात आले होते, ते गंगाजळीत गेले आहेत. घनकचरा व्यवस्थापन कामासाठी दरवर्षी कोटी रुपये खर्च केले जातात.*



*काही ठिकाणी मोबाईल टॉयलेट उभारली आहेत. ती नियमितपणे स्वच्छ ठेवली जात नसल्याने पर्यटकांना विशेषतः महिला पर्यटकांना खूपच त्रासदायक ठरत आहे. नगरपरिषदेचे कंपाऊंड, प्राथमिक शाळा त्याचप्रमाणे हुतात्मा स्मारक येथे बांधण्यात आलेल्या जांभ्या दगडातील भिंतीला लावण्यात आलेल्या तारेच्या संरक्षक जाळ्या निखळून पडल्या आहेत. शाळेच्या प्रांगणाजवळ असलेले लोखंडी गेट सुध्दा उन्मळून पडले आहे. अत्यावश्यक सेवा उपलब्ध करून देणाऱ्या नगरपरिषदेच्या दवाखान्यात दानशूर व्यक्तींनी दिलेले लाखो रुपये किंमतीचे साहित्य धूळ खात पडून आहे. मुख्य रस्त्यासाठी लागणारे क्ले पेव्हर ब्लॉक हे उत्तम दर्जाचे आहेत की नाही, याची शहानिशा न करता कामांचा सपाटा सुरू ठेवल्यामुळे काही ठिकाणी कच्च्या ब्लॉकमुळे रस्त्यांना खड्डे पडले आहेत. अशाप्रकारे अनेक ठिकाणी तकलादू कामे केवळ ठेकेदारांना पोसण्यासाठीच आणि स्वतःच्या लाभासाठी पूर्ण केली असल्याने शासनाच्या करोडो रुपयांचा चुराडा झालेला दिसून येत आहे. याबाबत स्थानिक मंडळी नेहमीच चर्चा करत आहेत की, कुठे नेऊन ठेवले आहे माथेरानला! निदान यापुढे तरी शासनाच्या निधीचा सदुपयोग करून या गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सुज्ञ लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावेत, असे सूर ऐकावयास मिळत आहेत.*

निवडक

## जासईत वस्तूंचे वाटप

**उरण :** जासई ग्रामपंचायतीतर्फे शुक्रवारी (दि.१५) १५ टक्के निधीमधून जासई गावामधील लोहात समाजबांधवाना विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले. शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी व महिलांसाठी आपल्या प्रपंच्यात हातभार लावण्यासाठी तसेच महिला वर्ग स्वतः शक्षम व्हावा या दृष्टीकोनातून त्यांना शिलाई मशीन आदी वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यमान सरपंच, उपसरपंच, सर्व सद्यस्य तसेच ग्रामसेवक भास्कर पालकर यांचे आभार मान्यता आले.

## भरारी पथकाची नजर

**आगरदांडा :** ३२ रायगड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत ७ मे ला निवडणूक होणार आहे. या पार्श्वभुमीवर कुठेही आचारसंहिता भंग होऊ नये, यासाठी भरारी पथक, आचारसंहिता पथक, स्थिर सर्वेक्षण व व्हिडिओ सर्वेक्षण पथकांची नेमवणुक केली आहे. त्या अनुषंगाने भरारी पथक मुरुड तालुक्यात २४ तास गस्त घालत आहे. भरारी पथकाचे प्रमुख अमोल दोंदे, किरण देशमुख, अतुल मडके, नथुराम रोहेकर, प्रकाश आरेकर, दत्ताराम नाईक, मनोज हंबीर, खेळु बांगारे आदी कर्मचारी उपस्थित होते.

## माकडांच्या टोळीचा धुमाकुळ

**अलिबाग :** कार्लेखिंड परिसरात माकडांच्या टोळ्या दाखल झाल्या आहेत. येथे आठ माकडांच्या टोळीने धुमाकूळ घातला आहे. अन्न व पाण्याच्या शोधात इकडेतिकडे उड्या मारीत आहेत. ग्रामस्थही पोळी भाकरी खाऊ घालीत आहेत. सुटीतील बच्चे कंपनी माकडांच्या उड्या बघत मनोरंजन करून घेत आहेत. मात्र माकडांच्या या धुमाकूळीने ग्रामस्थ त्रस्तही झाले आहेत. सध्या ही माकडे परिसरातील आब्यांच्या झाडावर कैऱ्या फस्त करत आहेत. तसेच आब्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहेत.

## खारघर परिसरात चरस हस्तगत

**पनवेल :** अमली पदार्थ विरोधी पथकाने खारघर परिसरात कारवाई करून ५५ लाख ६८ हजारांचे किमतीचे चरस हस्तगत केले आहे. याप्रकरणी दोघांना अटक केली आहे. त्यांच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पनवेल शिळफाटा मार्गावर अमली पदार्थ तस्करी होत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती.त्यानुसार पोलीस पथकाने दोघांना ताब्यात घेतले असता त्याच्याकडे चरस आढळले. गुन्हे शाखा पोलिसांनी त्यांच्याकडीस चरस जप्त केला आहे.

## स्थानिक भाज्यांना पसंती

**रसायनी :** रसायनीतील वासांबे मोहोपाडा बाजारपेठेत स्थानिकांच्या उन्हाळी फळभाजीपाल्याला मागणी वाढत आहे. अगदी वाजवी दरात ताजी भाजी मिळत असल्याने ग्राहक पसंती देत आहे. यामध्ये टोमॅटो, गवार, घोसाळी, वांगी, काकडी, कारली आदी पिकांचा समावेश असतो. बाजारामध्ये गवार, भेंडी, कारली चवळी, मिरची, मेथी, कोथिंबीरीला चांगला भाव मिळत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. शिवाय, या फळभाज्या ताज्या असल्याने त्याची विक्री मोठ्या प्रमाणावर होते.

# भंगारवाल्यांचे अतिक्रमण

## नेरळ- कल्याण मार्गावरील घटना, विद्यार्थ्यांचा जीव मुठीत घेऊन प्रवास

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातुन ठाणे जिल्ह्यात जाण्यासाठी असलेल्या कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर भंगारवाल्याने अतिक्रमण केले आहे. याच भंगारवाल्याने आपले भंगार चक्क रस्त्यावर ठेवले होते. त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून जेसीबी लावून ते भंगार तेथून हटवले होते. मात्र, पुन्हा एकदा कर्जत-कल्याण रस्त्यावर भंगारवाल्याने आपले भंगार पुन्हा रस्त्यावर आणले आहे.**



नेरळ ग्रामपंचायत हद्द सोडल्यानंतर कर्जत -कल्याण राज्यमार्ग ममदापुर ग्रामपंचायत हद्द आहे. त्या भागात नेरळ विद्या मंदिर शाळा असून या शाळेच्या रस्त्यावर भंगारवाल्याने रस्त्याच्या जागेत अतिक्रमण केले आहे. राजमार्ग रस्त्यावर रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटरची जमीन सार्वजनिक बांधकाम खात्याची असते. मात्र, डांबरी रस्त्यापर्यंत हे अतिक्रमण येऊन थांबले आहे. त्यामुळे शाळेत जाणारे विद्यार्थी यांना जीव मुठीत घेऊन रस्ता पार करावा लागतो. रस्त्याच्या डांबरी पट्ट्यापर्यंत हा भंगारवाला येऊन पोहचल्याने त्या व्यावसायिक याला कोणत्या नेत्याचे आशीर्वाद आहेत याबद्दल दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे. दुसरीकड सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यात त्या भंगार वाल्यावर कारवाई केली होती. मात्र, तरीदेखील त्या भंगारवाल्याने भंगार रस्त्यावर आणून ठेवले आहे. त्या रस्त्याने येणारे जाणारे विद्यार्थी यांची गैरसोय टाळण्यासाठी त्या भणंगावल्याचे अतिक्रमण रस्त्यावर आणि रस्त्याच्या जागेवरून पूर्णपणे काढण्याची गरज तेथील दोन्ही शाळांकडून बांधकाम खात्याला निवेदन देऊन केली आहे.

सार्वजनिकबांधकामखात्यानेपावसाळ्यात त्या ठिकाणी जेसीबी मशीन लावून रस्त्यावर आलेले भंगार हटवले होते. मात्र, त्यावेळी सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्त्याच्या जागेत भंगार ठेवण्यास प्रतिबंध करणारी नोटीस भंगार विक्रेत्याला बजावली नव्हती. त्याचा परिणाम आता पुन्हा एकदा रस्त्याचा मोठा भाग भंगार विक्रेत्याने व्यापला आहे.



## महानगरपालिकेची स्थानिकांवर कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय विक्रेते मोक्याच्या जागा अडवून बसले असताना त्यांच्यावर कारवाई करण्याचे सोडून पनवेल महानगरपालिकेचे अतिक्रमण विभाग वनवासी, आदिवासी माताभगिनींच्या व्यवसायावर कारवाई करताना दिसत असल्याने पनवेलमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

शहरातील मार्केट यार्ड परिसर, शिवाजी चौक, बँक ऑफ महाराष्ट्र, आदर्श नाका, टपाल नाका, प्राचीन हॉस्पिटल परिसर, उपजिल्हा रुग्णालय परिसर, बाजापेठ, जोशी आळी आदी भागात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय विक्रेत्यांनी मोक्याच्या जागेवर घूस खोरी केली आहे.

या संदर्भात वारंवार प्रसार माध्यम व सोशल मीडियाद्वारे तक्रारी करूनसुद्धा या परप्रांतीय व्यवसायिकांविरोधात अतिक्रमण विभाग कारवाई करताना दिसत नाही, तर या उलट आपले काही वनवासी बांधव जुन्या तहसील कार्यालयासमोर म्हणजेच जुन्या पोलीस स्टेशन जवळ फळे, भाजी व इतर वस्तू विकायला बसले होते. त्यांच्या विरोधात महापालिकेच्या अतिक्रमण विभागाची लोकं येऊन त्यांचा माल उचलत आहेत.

या संदर्भात अ‍ॅड. साखरे यांनी जाब विचारला असता त्यांनी नम्र पणाचे धोरण घेतले. या पुढे अशा प्रकारे स्थानिक भूमिपुत्रांवर कारवाई केल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात न्यायालयीन लढा देण्याचा मानस अ‍ॅड. साखरे यांनी व्यक्त केला आहे.



## गरिबांचा फ्रिज ग्रामीण भागात दाखल

**। शिहू । वार्ताहर ।**

उष्णतेच्या लाटेने नागरिक बेहाल झाले आहेत. घशाला कोरड पडत असल्याने तहान भगविण्यासाठी अनेकांना थंड पाणी हवे असते. अनेकजण फ्रिजऐवजी मातीच्या माठातील थंड पाणी पिण्याला पसंती देत आहेत. शिहूसह ग्रामीण भागात मात्र, पारंपरिक माठांऐवजी राजस्थानी माठांना अधिक मागणी असल्याने स्थानिक कुंभार व्यवसायिकांना ऐन हंगामात नुकसान सोसावे लागत आहे. विजेशिवाय पाणी गार होण्याचे साधन म्हणजे पारंपारिक मातीचे माठ. याला गरिबांचा फ्रिज म्हणूनही ओळखले जाते. शीतल व गारेगार पाण्यासाठी मातीच्या माठांना पसंती असते. काहीजण मागच्या वर्षाचे माठ स्वच्छ करून तो वापरता. काहीजण नविन माठ घेण्यासाठी कुंभारवाड्यात जातात.

मागील काही वर्षापासून राजस्थानी बनावटीचे तयार व स्वस्त माठ बाजारात दाखल झाले आहेत. राजस्थानी माठ कुठल्याही भटकंतीशिवाय फेरीवाले त्यांच्या माध्यमातून दारात येत असल्याने ते हातोहात विकले जात आहेत. या मुळे पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या माती कारागीरांचा व्यवसाय डबघाईला आला आहे. स्थानिकांनी बनवलेल्या माठाला अकरानुसार २०० ते ५०० मोजावे लागतात. राजस्थानी माठ २०० ते ३०० रुपयांना नळासह मिळतात. त्यामुळे ग्राहकांची त्यांना पसंती मिळत आहे. दरवर्षी प्रमाणे यंदा ही राजस्थान येथून लाल मातीचे माठ ग्रामीण भागात दाखल झाले आहेत.

## रेल्वे स्थानकाबाहेर पिस्तुलासह आरोपी ताब्यात

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल रेल्वेस्थानकाच्या बाहेर पोलिसांनी एकाला अटक करून त्याच्याकडील पिस्तूल जप्त केले आहे. अटक केलेला तरुण मूळचा उत्तर प्रदेशचा असून, त्याठिकाणी तो शस्त्र विक्रीसाठी आला असावा, अशी शक्यता आहे. तत्पूर्वीच पनवेल शहर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

विक्रीसाठी एकजण अग्निशस्त्र येणार असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वपोनि नितीन ठाकरे, गुन्हे शाखेचे अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद लभडे, अभयसिंह शिंदे, अविनाश गंथडे, नितीन वाघमारे, महेंद्र आयकर, सूर्यकांत कुडावकर, प्रसाद घरत, किरण कराड, साईनाथ मोकळ यांचे पथक केले होते. त्यांनी सापळा रचला होता. यावेळी रेल्वेने प्रवास करून आलेला एकजण पोलिसांच्या नजरेस पडताच त्याला थांबवण्याचा इशारा केला. त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता पाठलाग करून पकडण्यात आले. यावेळी त्याच्याकडील बॅगेची झडती घेतली असता त्यामध्ये एक जिवंत पिस्तूल व दोन काडतुसे आढळून आली. याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. यावरून त्याठिकाणी तो शस्त्र विक्रीसाठी आला असावा, असा अंदाज वर्तवला जात. अंकित कुमारला अटक करत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## पोलादपूरमध्ये शेतकऱ्यांना प्रशिक्षण

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक जैविक शेती मिशन अंतर्गत शेतकरी गट प्रशिक्षण तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या प्रशिक्षणासाठी शेतकरी गट कंपनीचे संचालक नारायण महाराज कळंबे व नवनियुक्त संचालक तसेच तालुक्यातील शेतकरी गटांचे अध्यक्ष, सचिव, सदस्य उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी डॉ. जीवन आरेकर यांनी सेंद्रिय शेती प्रत्यक्षात शेतात कशा प्रकारे करावी याबाबत माहिती दिली. तालुका कृषि अधिकारी सुरज पाटील यांनी शेतकरी गटांची कार्य पध्दती विषयी माहिती दिली तसेच रविंद्र गुंड यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व या विषयी माहिती दिली. त्याच प्रमाणे शेतकऱ्यांनी सुध्दा चर्चासत्रात भाग घेवून नारायण कळंबे, हनुमंत दळवी, जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीरंग मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल वालेकर, मनोज जाधव, बरकडे, डासालकर, काकड, खराडे, कचरे, मोमीन व श्रीरंग मोरे, नितीन धायगुडे, कृषी पर्यवेक्षक रविंद्र गुंड यांनी सहकार्य केले.

## आयकर विभागाचे राहणार पैशांच्या गैरवापरावर लक्ष

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकांच्या काळात होणाऱ्या पैशांच्या गैरवापरावर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक विशेष नियंत्रण कक्ष पुणे आयकर विभागान स्थापन केले आहे. हा कक्ष रायगड जिल्ह्यावर नजर ठेवणार असून आठवड्याचे सातही दिवस आणि २४ तास कार्यरत असणार आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये होणाऱ्या पैशांच्या अधिकाराच्या गैरवापराशी संबंधित माहिती, तक्रारी देण्यासाठी पुढील संपर्क क्रमांक, ईमेल किंवा पत्ता टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-०३५३, टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-०३५४, व्हॉट्सॲप क्रमांक : ९४२०२४४९८४या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून नागरिक तक्रारी नोंदवू शकतात किंवा पैशांच्या गैरवापराची माहिती देऊ शकतात. रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांसाठी हा कक्ष आहे. यामुळे लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत काळ्या पैशाच्या गैरवापरावर लक्ष ठेवण्यास आणि त्यावर अंकुश ठेवण्यासाठी आयकर विभागाला मदत होईल असे किशन जावळे यांनी स्पष्ट केले.

## लिलाबाई यांचे निधन

**। नागोठणे । वार्ताहर ।**




नागोठणे बाजारपेठेतील रहिवासी लिलाबाई हरकचंदजी केवलसामुथा (वय ८०) यांचे सोमवारी (दि. १८) वयोवृध्दत्वामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात श्रिपाल, दिलिप, ललित व अजित हे चार विवाहित मुलगे, सुना, नातवंडे, पतवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर नागोठण्यातील अंबा घाटावरील स्मशानभूमीत सोमवारी (दि.१८) दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## वाघोडे येथे महिलादिन साजरा



**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील सोगाव येथील एस.ओ.एस. बालग्रामच्या कुटुंब सशक्तिकरण कार्यक्रमांतर्गत वाघोडे येथे महिलादिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त वाघोडे येथील आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांना सौरदिव्यांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी बालग्रामचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंता कार यांनी उपक्रम याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमास जयंतराव गायकवाड, प्रकाशवाटाच्या समुपदेशक प्राची देशमुख, महेश एम.व्ही., ओंकार कुलकर्णी, कृष्णा जाधव, पठाण रियाजखान व सुजय बाजपाई याप्रसंगी उपस्थित होते.



होळी-रंगपंचमीसाठी रंगीबेरंगी टी-शर्ट पनवेलमध्ये दाखल झाले आहेत. (छायाचित्र-राजेश डांगळे)

## श्रीदेव काळभैरवनाथ महाराजांचा होलिकोत्सव

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

पोलादपूरचे श्रीदेव काळभैरवनाथ महाराज आणि ग्रामदैवतांच्या होलिकोत्सवानित्ति रविवारी दि. २४ ते शनिवारी दि. ३० मार्चपर्यंत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीमध्ये हळकुंड जमविणे, होळी, काठी नाचविण्याच्या स्पर्धा, जागरव्यवस्था, हरिपाठ, आदिशक्ती महिला मंडळाचे भजन, देवाचा गोंधळ आणि शनिवारी (दि.३०) रंगपंचमीला ग्रामदैवतांची ग्रामप्रदक्षिणा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



यावर्षी देवस्थानचा वार्षिक जत्रौत्सव शनिवारी (दि.२०) एप्रिल रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती श्रीकाळभैरवनाथ देवस्थान, पोलादपूरचे अध्यक्ष बाबूराव महाडीक यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. गेल्या काही वर्षांपासून पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीदेव काळभैरवनाथ देवस्थानच्या मंदिराचा कळस, इमारत, मुर्ती, रूपे, दागिने, अंतर्गत सजावट व विद्युत रोषणाई, मंदिराबाहेरील स्थानांची बांधकामं तसेच उत्सवांचे स्वरूप यामध्ये श्रीकाळभैरवनाथ देवस्थान, पोलादपूरचे अध्यक्ष बाबूराव महाडीक यांच्या कारकिर्दीमध्ये विविध कार्यक्रम झाल्याने भाविक आनंद व्यक्त करत आहेत.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **विहिरी** - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील- अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- **पिकअप आणि ४०७ वरती** अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. पगार १५०००/१८००० mob.No.8007893232
- **इंग्लीश बोलण्यांतील अडथळे,** भिती खात्रीने घालवणार सोपा कोर्स. नंबर जपून ठेवा, गरज लागेल. ९८२२८४२८१०
- **बोअरवेल-विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा- (व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.
- **शिवानी पेट शॉप, अलिबाग येथे कामाकरीता मुलगी पाहिजे** (कमीतकमी १२ वी पास) संपर्क : ९२७२३८३४७६/९८६०६५८४९६
- **अलिबागपासून सुमारे दहा किलोमीटरवर वढाव (खुर्द) येथे** गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमीन बोअरवेल, मीटर व घरपरवानगीसहीत विकणे आहे. संपर्क : ७२७६५९१३०२
- **साईश्रद्धा फाऊंडेशनच्या अलिबाग येथील ऑफिससाठी अ‍ॅबॅकस** शिकवण्यासाठी शिक्षक पाहिजे तसेच अकाऊंटंट कम क्लार्क पाहिजे. तसेच म्युच्युअल फंड व शेअर मार्केटसाठी सेल्स पर्सन पाहिजेत. आपला बायोडाटा ८३९०९०९४७० किंवा ८१६९६०४५७५ वर वॉटसअप करा.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# होलिकोत्सवासाठी बंदरात सजलेल्या नौका

गणेशोत्सवानंतर होळीकोसत्व हा कोळी बांधवांचा महत्वाचा सण असल्याने हा सण साजरा करण्यासाठी मुरूड तालुक्यातील सर्व कोळीवाडे सज्ज झाले आहेत. तालुक्यात कोळी समाजाची मोठी लोकवस्ती आहे. मुख्य होळीच्या आधी १५ दिवस समुद्रकिनाऱ्यावर छोट्या स्वरूपात कोळी बांधवांच्या बाळगोपाल मंडळींकडून दररोज रात्री होळी पेटविली जाते अशी माहिती कोळी समाजातील ज्येष्ठ नेते मनोहर बैले यांनी दिली.

तालुक्यातील राजपूरी, एकदरा, नांदगाव या गावच्या नौका मुंबईतून येण्यास सुरुवात झाल्याची माहिती नाखवा रोहन निशानदार यांनी दिली. आमच्या दाराशी हाय शिमगा.... अशी पारंपरिक गाणी गुणगुणत, फुलांच्या माळांनी सजवलेल्या होड्या गावी दाखल होताना दिसून येत आहेत.



मुंबईत मासेमारीसाठी वास्तव्यासाठी असणाऱ्या शेकडो नौका मुरूड, राजपुरी, एकदरा, राजपूरी, नांदगांव, बोर्ली, मजगाव येथे आपापल्या गावी झुली, पताका, झेंडे, फुलांनी सजवून वाजत गाजत येऊ लागल्या आहेत.

२१ ते २२ मार्चपर्यंत तालुक्यातील मुंबईत असणाऱ्या शेकडो नौका दरवर्षीप्रमाणे गावी येणार आहेत.

तालुक्यात कोळी बांधवांचा पारंपरिक, आनंददायी होळी सण पाहण्यासाठी परदेशी पर्यटक, बाहेर गावचे पर्यटक देखील येत असतात.

मुख्य होळीच्या दिवशी मुरूड बाजारपेठ भागात सुपारी झाड नाचविण्याची वेगळी परंपरा अद्यापही सूरु आहे. कोळीवड्यात धुलीवंदनाच्या दिवशी कोळीबांधव पारंपरिक वेशभूषा करून नृत्य करण्याची परंपरा पाहायला मिळते. होळीच्या मुख्य दिवशी म्हणजे हुताशनी पौर्णिमादिनी कोळी महिला-पुरुष, तरुण-तरुणी, मुले रात्री होळी मैदानावर एकत्र येऊन फेर धरून होळीची गीते गात पारंपरिक नृत्य करतात. विधिवत पूजन झाल्यानंतर पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो.

# अनधिकृत भित्तीपत्रके काढण्याचे आवाहन

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सिडको मेट्रो मार्ग १ बेलापूर ते पेंधरच्या पुलावर व स्थानकांवर खासगी व्यक्ती/संस्थांकडून मेट्रो प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत भित्तीपत्रके लावण्यात आल्याचे तसेच संदेशवहनाच्या तारा टाकण्यात आल्याचे सिडकोच्या निदर्शनास आले आहे. या संदर्भातील वृत्त प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून संबंधित व्यक्ती/संस्था यांनी अनिधकृत भित्तीपत्रके व संदेशवहन तारा काढून न टाकल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा सिडकोने दिला आहे.




सिडकोच्या मेट्रो मार्ग क्र. १ वर १७ नोव्हेंबर २०२३ पासून प्रवासी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. काही खासगी संस्थांकडून या मेट्रो मार्गावरील पुलावर व स्थानकांवर अनधिकृतरीत्या भित्तीपत्रके लावण्यात आली असून संदेशवहनच्या ताराही टाकण्यात आल्या आहेत. यामुळे मेट्रो गाड्यांच्या परिचालनास व मेट्रो रेल्वेच्या बांधकामांस धोका निमर्ण झाला आहे. सिडकोची किंवा मेट्रो प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता करण्यात आलेल्या अशाप्रकारच्या कृतींना मेट्रो रेल्वे मनाई करण्यात आली आहे. संबंधित व्यक्ती/संस्था यांनी वृत्त प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसांच्या आत स्वत:हून सदर मार्गावरील अनधिकृत भित्तीपत्रके व संदेशवहन तारा काढून टाकाव्यात. अन्यथा, मेट्रो रेल्वे प्राधिकरणाकडून ही भित्तीपत्रके व संदेशवहन तारा काढण्यात येतील. तसेच कायदेशीर कारवाई करून दंड आकारण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहिर हरकत

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्री. राजेंद्र शिवाजी पाटील यांनी सदर मिळकत विक्रीस काढली असल्याचे आमचे अशिल श्री चंद्रकांत शिवाजी पाटील रा. चोरोंडे, ता. अलिबाग, जिल्हा - रायगड यांना खात्रीशीरपणे समजले आहे.

वास्तविक, खालील परिशीष्टात नमूद केलेली मिळकत ही मुळची आमचे अशिल व मिळकतीचे विदमान मालक यांनी एकत्रितरीत्या खरेदी केलेली होती. त्यामुळे सदर मिळकत ही आमचे अशिल व मिळकतीच विद्यमान मालक यांची मालकी हक्काची वहिवाटीची ताबेकब्जाची होती व आहे. आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक हे सख्खे भाऊ असल्यामुळे आमचे अशिलांनी सदर मिळकत खरेदी करताना विद्यमान मालक यांच्यावर विश्वास असल्यामुळे तसेच आमच्या अशिलांच्या नावे आणखी काही मिळकती असल्यामूळे सदर मिळकत ही विदयमान मालक यांच्या नावे केली. त्यानुसार सदर मिळकतीच्या सात बारा उतारावर मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या एकटयाच्या नावाची नोंद करण्यात आली. त्यानुसार सदर मिळकतीचे विद्यमान मालक हे मिळकतीचे मालक झालेले आहेत. सद्य स्थितीत विद्यमान मालकाचे नाव सात बारा सदरी असलेल्या व्यक्तीने सदर मिळकत विक्रीस काढली असल्याची खात्रीशीर माहिती आमच्या अशिलांना मिळाली आहे. आमचे अशिल सदर मिळकतीचे मालकी हक्क संबधाने कायदेशीर मालक असून त्यांचा सदर मिळकतीमध्ये हक्क व अविभाज्य हिस्सा आहे.

तरी सदर मिळकती बाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा साठेकरार, बयाणापावती अगर खरेदी विक्रीचा दस्तएवज अथवा कसलाही व्यवहार करु नये, अशाप्रकारे कोणत्याही तिराहीत इसमानी हक्क अथवा अधिकार निर्माण केल्यास तो आमच्या अशिलांचे सदर मिळकतीतील हिश्यावर बंधनकारक राहणार नाही. सदर व्यवहारामुळे कोणाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास, आमचे अशिल त्यास जबाबदार राहणार नाहीत अथवा सदर व्यवहार हा आमचे अशिलांचे हित संबंधावर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे पोयनाड ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | भुमापन क्रंमाक व उपविभाग | क्षेत्र हे-आर- | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| राजेंद्र शिवाजी पाटील | १६६/१ | ०-२५-४०<br>०-०१-७० पोटखराबा | ५.१९ |

येणेप्रमाणे जाहीर हरकत दिली असे
अलिबाग
दिनांक १९/३/२०२४
अशिलांच्या मान्यतेची सही
चंद्रकांत शिवाजी पाटील

सही/-
**ॲड. विश्वनाथ धर्मा भगत**
जिल्हा न्यायालय रायगड- अलिबाग

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### ई-लिलाव सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने मुख्य वाणिज्य प्रबंधक ने खालील वेळापत्रकानुसार आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर प्रकाशित केलेल्या व्यावसायिक करारांचा ई-लिलाव जाहीर केला आहे.

**अनु. क्र. 1: कराराचे नाव:** एसएलआर भाड्याने देणे. **करार/लॉट्सची संख्या:** 05. **प्रकाशनाची तारीख:** 20/03/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 26/03/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 2: कराराचे नाव:** रोड ओव्हर ब्रिज/रोड अंडर ब्रिज (महाराष्ट्र आणि गोवा) जवळ होर्डिंगद्वारे जाहिराती. **करार/लॉट्सची संख्या:** 20. **प्रकाशनाची तारीख:** 20/03/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 26/03/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 3: कराराचे नाव:** चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमाळी, कारवार, बैंदूर येथील स्टेशन परिसरावर व्हिडिओ स्क्रीनद्वारे व्यावसायिक प्रसिद्धी. **करार/लॉट्सची संख्या:** 6 (24 मालमत्ता). **प्रकाशनाची तारीख:** 20/03/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 27/03/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 4: कराराचे नाव:** अस्नोटी, अंकोला, कुमटा, मुर्डेश्वर, कुंदापुरा, सूरतकल, मडगांव रेल्वे स्थानकांवर पे आणि पार्किंग करार. **करार/लॉट्सची संख्या:** 07. **प्रकाशनाची तारीख:** 20/03/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 27/03/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 5: कराराचे नाव:** केआरसीएलवर कोलाड ते ठोकुर दरम्यानच्या स्थानकांवर जाहिरात फलक, होर्डिंग्जद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात. **करार/लॉट्सची संख्या:** 24. **प्रकाशनाची तारीख:** 20/03/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 28/03/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 6: कराराचे नाव:** ट्रेनमध्ये जाहिरातींचे प्रदर्शन - मडगांव - मंगलूरु - मडगांव (10107/10108) मेमू ट्रेन. **करार/लॉट्सची संख्या:** 01. **प्रकाशनाची तारीख:** 20/03/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 29/03/2024 सकाळी 11:00 वाजता.

**चौकशीसाठी कृपया संपर्क करा: 1)** श्री. प्रवीण डावरे, **Mob.No.** 9004470597, **2)** श्री शैलेश सावंत, **Mob.No.** 9004470596, **3)** श्री मधुकुमार शेट्टी, **Mob.No.** 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** या वेबसाइटला भेट द्या.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल **श्री. प्रदीप रमेश मुकादम** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **श्री. साईनाथ महादु भोईर** यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे.धोत्रे, ता.कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३ | ४ | ०-३९-००<br>पो.ख. ०-०६-०० | ०-३० |

यापैकी श्री. साईनाथ महादु भोईर यांचे मालकीची ०-२३-०० हे.आर.क्षेत्राची मिळकत

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २०/०३/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राह्मणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९३२५०६००३७.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की श्री. अच्युत सावळाराम पाटील यांचेकडून आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून तशी त्याबाबत बयाणा पावती केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| सातघर ता. अलिबाग जि.रायगड | ४८ | ०-१३-७०<br>पो.ख.०-०२-०० | ३.४४ |

इतके क्षेत्र हा या नोटीसचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, वहीवाट, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवासांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २०/०३/२०२४

सही/-
**ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी २ हीराबाग सोसायटी जिल्हा न्यायालयाच्या समोर सगुण हॉटेलच्या वर
अलिबाग-रायगड मो नं. ९२७१७७५२७७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिरुद्ध विष्णू आठवले, रा.१/अे, तळमजला, शिवम सोसायटी, ब्राह्मण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, सिटी सर्व्हे नं. १११२अे,१११२बी,१११२ या मिळकतीवरील 'शिवम को.ऑप.हौसिंग सोसायटीमधील 'अे'विंग तळ मजल्यावरील व्यापारी गाळा क्र. १ क्षेत्र २९७ चौ.फुट कारपेट, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. १६२४ (Z1BHA001961) हा दुकानी गाळा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १९-०३-२०२४

सही/-
**ॲड. आर.बी. कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राह्मण आळी, अलिबाग

दि.१०/०४/२०२४ अर्जदारतर्फे ॲड. प्रथमेश प्र. पोतदार

**अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१९७/२०२३
नि. नं.
ने. ता. / / २०२४

१) श्रीमती. अरुणा केसरीनाथ कोळी
वय ५८ वर्ष, धंदा - गृहिणी, रा. प्लॉट नं. ४७,
गौरी मंगल, आनंदनगर, चेंढरे, अलिबाग, — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड.
२) श्री. तेजस केसरीनाथ कोळी
वय २६ वर्षे, धंदा - नोकरी, रा. प्लॉट नं. ४७,
गौरी मंगल, आनंदनगर, चेंढरे, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

विरुध्द

सौ.तनया साईनाथ कोळी
३० वर्षे, धंदा - गृहिणी, — सामनेवाले
रा. फ्लॅट नं.३०२, प्लॉट नं. ४७,
सेक्टर-९, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड.

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं. २ व सामनेवाले यांचे वडील केसरीनाथ मंगळया कोळी हे दि. २१/१२/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांच्या नावे असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतींचे अर्जदार हे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन VIII ऑफ १८२७ अन्वये या न्यायालयाकडे दि.०४/११/२०२३ रोजी अर्ज केलेला आहे.

**अ) जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नवेदर बेली, ता. अलिबाग, जि.रायगड | ३२/२ | ०-२१-१० | १.१९ |
| तुडाळ, ता. अलिबाग, जि.रायगड | ३१/१अ | ०१-०१-१०<br>पैकी ०-०१-२५ | ०.०३ |

**ब) निवासी सदनिकांचे वर्णन**

| मौजे | इमारतीचे नांव | मजला | फ्लॅट नं. | क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|
| अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड | श्रीमान अपार्टमेंट | १ ला | (फ्लॅट नं.१०६) | ४२.७७ (५९८ चौ. फू.) |
| करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड | जय प्लाझा को. ऑप. सोसायटी | ५वा | ५०७ | २७.५४० |

आणि ज्याअर्थी, सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करण्याची असल्यास अशा लोकांनी दि. १०/०४/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता न्यायालयात स्वतः अगर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि.१०/०४/२०२४ रोजी अगर तत्पूर्वी सदर वारस दाखला देणेबाबत अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १२ माहे मार्च २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/-**
**लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**अलिबाग - रायगड**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**अलिबाग- रायगड**

## जाहीर सुचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे जिगनू कृष्णा कारभारी राहणार हिऱ्याचापाडा, आधारवाडी जेल रोड, गणपती मंदिराजवळ, कल्याण, पश्चिम ठाणे यांनी खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत तिचे मालक १.अर्जुन नामदेव भगत २.रमेश काशिनाथ माळी ३.जनाबाई रमेश कुरंगळे ४.लता गणेश माळी ५.सुजाता गणेश माळी ६. करिष्मा गणेश माळी अ.क्र.५ आणि ६ चे अ.पा.क.आई लता गणेश माळी ७.कल्पेश पांडुरंग बडवे ८.सुशिला मोरेश्वर पोपटे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन :**
**मौजे-आंबिवली बुद्रुक, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| ६० | ३ | ०.०७.३० | ०.४१ |

वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणताही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास आणि त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार अथवा हरकत विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २० मार्च २०२४

**अधिवक्ता अतिती दिनकर बदे**
बी.एल.एस.एलएल.बी.
एन्रोलमेंट क्रमांक एमएच (2679/2013)
adv.atiteebade@gmail.com

१, तळमजला, दत्तकृपा सोसायटी
छत्रपती शिवाजी मैदानासमोर,
मु.पो.नेरळ ता.कर्जत,जि.रायगड
भ्रमणध्वनी :7887711071

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- ३३/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार
वय ६५ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. जुने माणगाव,
ता. माणगाव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगाव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगाव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, ता. माणगाव, जि. रायगड

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,**

सदरहु अर्जदार श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार यांचा मुलगा श्री. दानिश नजीर अहमद जामदार याचा जन्म मौजे जुने माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. २४-०५-१९८८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. २०७४/२०२३-२४ ने दि. ०१-०३-२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा मुलगा श्री. दानिश नजीर अहमद जामदार याचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगाव, जि.रायगड येथे दि. २४-०५-१९८८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार यांचा मुलगा श्री. दानिश नजीर अहमद जामदार याचा जन्म मौजे जुने माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे दि. २४-०५-१९८८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १९/०३/२०२४

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-३२/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार
वय ६५ वर्षे, धंदा : शेती. — अर्जदार
रा. जुने माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह, नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड.

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,**

सदरहू अर्जदार श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार यांची मुलगी श्रीम. सदफ नजीर अहमद जामदार हिचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि.०९/०५/१९९१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांच्या मुलीची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. २०७३/२०२३-२४ ने दि. ०१/०३/२०२३ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची मुलगी श्रीम. सदफ नजीर अहमद जामदार हिचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०९/०५/१९९१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार यांची मुलगी श्रीम. सदफ नजीर अहमद जामदार हिचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि.०९/०५/१९९१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १९/०३/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क:-१५/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. मोहमद अली कासिम ठाणगे
वय : ६९ वर्षे, धंदा : नोकरी,
रा. मु.पो. दहिवली, — अर्जदार
ता. माणगाव, जि. रायगड,

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले,
ता. माणगाव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगाव,
ता. माणगाव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. मोहमद अली कासिम ठाणगे यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०६/१९५५ रोजी झाला. त्यांचे जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. १६२/२०२३ दि. ०२/११/२०२३ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे जन्म मौजे दहिवली, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०६/१९५५ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. मोहमद अली कासिम ठाणगे यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०६/१९५५ रोजी येथे झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. २०/०३/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे-वरई तर्फे निड, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री. महेंद्र राजमल चोरडिया<br>२) श्री. सुशिल राजमल चोरडिया | ३७ | १ | १.०१.५०<br>पो.ख. ०.०४.६०<br>एकूण -१.०६.१० | १५.०५ |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे आशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. २०/०३/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. तनिष्का यतिन आहिर**
पत्ता. आहिर निवास, गारपोली,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८४४६५५२४६८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-पाथरज, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मे.अर्थ फॉम लि. तर्फे प्रियंका वर्मा | ५६ | २/ब/२ | ०-४०-०० | ०-४० |
| मे. अर्थ फॉम लि. तर्फे प्रियंका वर्मा | ५६ | २/ब/२/ब | ०-२०-०० | ०-१६ |
| मे. अर्थ फॉम लि. तर्फे प्रियंका वर्मा | ५६ | ६/ब/१ | ०-४०-०० | ०-३४ |
| मे. अर्थ फॉम लि. तर्फे प्रियंका वर्मा | ५६ | ६/ब/२ | ०-४०-०० | ०-३३ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १९/०३/२०२४

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. ३१/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. अशोक भागोजी करकरे
वय: ४९ वर्षे, धंदा शेती.
रा. मु. .पो. पन्हळघर, — अर्जदार
ता. माणगाव, जि. रायगड,

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत पन्हळघर खु.,
ता. माणगाव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगाव,ता. माणगाव, जि. रायगड,

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अशोक भागोजी करकरे यांचा जन्म मौजे पन्हळघर खु., ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०२/१९७५ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०१/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे पन्हळघर खु., ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०२/१९७५ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अशोक भागोजी करकरे यांचा जन्म मौजे पन्हळघर खु., ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०२/१९७५ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १८-०३-२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या आशीलांनी मौजे - सारळ, ता. अलिबाग येथील श्री. कृष्णा सीताराम कडवे, रा. सारळ, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमिन मिळकत खरेदी करण्याचे ठरवले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भूमपान क्रमांक | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सारळ, ता.अलिबाग, जि. रायगड | ३०१ | क्षेत्र : ०-२८-७० | ७.३१ |

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वाहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशीलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागवून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १९/०३/२०२४

सही /-
**ॲड. ऋग्वेद अ. ठाकूर**
मो. ९८५००९०१०३
(कार्यालयीन पत्ता : ठाकूर अँड असोसिएटस, ए २०३, वसंतपुष्प को.ऑप.हौ.सो.लि.अलिबाग-रायगड)

**निवडक**

## ऑस्ट्रेलियाने टाळली मालिका

**मुंबई** : ऑस्ट्रेलियाने अफगाणिस्तानसोबतची टी २० मालिका पुन्हा एकदा टाळली आहे. यापूर्वी देखील ऑस्ट्रेलियाने १४ महिन्यापूर्वी अफगाणिस्तानसोबतची मालिका टाळली होती. दोन्ही मालिका टाळण्याचे कारण मात्र एकच आहे. ते म्हणजे तालिबान! अफगाणिस्तानात तालिबानचं राज्य आल्यापासून ऑस्ट्रेलिया त्यांच्या क्रिकेट संघाविरूद्ध क्रिकेट मालिका खेळण्यात रस दाखवत नाही. अफगाणिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात या वर्षी ऑगस्ट महिन्यात मालिका होणार होती.

## सिद्धू करणार समालोचन

**मुंबई** : काँग्रेस नेते आणि माजी क्रिकेटर नवज्योत सिंग यांची पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात एन्ट्री निश्चित झाली आहे. नवज्योत सिंह यांचे समालोचक म्हणून पुनरागमन होणार आहे. सिद्धू आपल्या हटके स्टाईलने आयपीएलमध्ये पुन्हा एकदा समालोचन करणार आहेत. सिद्धू यांनी आतापर्यंत अनेकदा शेरोशायरी आणि खास शैलीत समालोचन केले आहे. क्रिकेट चाहत्यांना त्यांचा हाच अंदाज आवडतो. काही चाहते हे सिद्धू यांचे समालोचन ऐकण्यासाठी चाहते उत्सुक आहेत.

## महाराष्ट्र उपांत्यपूर्व फेरीत गारद

**मुंबई** : ३३व्या किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र उपांत्यपूर्व फेरीत गारद. काल रात्री उशीरा झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात भारतीय क्रीडा प्राधिकरणने महाराष्ट्राचे आव्हान ३७-२२ असे संपुष्टात आणले. पूर्वार्धात १२-२२ अशा पिछाडीवर पडलेल्या महाराष्ट्राला उत्तरार्धात देखील सूर सापडला नाही. अखेर महाराष्ट्राला १५गुणांनी पराभव पत्करावा लागला. विशाल गाढवे, सूरज झगडे यांनी महाराष्ट्राकडून थोडा फार प्रतिकार केला.

## राहुल आयपीएलसाठी फिट

**मुंबई** : इंडियन प्रीमियर लीग हंगामासाठी राहुलला फिट घोषित करण्यात आले आहे. लखनऊ सुपर जायंट्स कर्णधाराला बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने फिट घोषित केल्याने तो पुढील दोन दिवसांत संघात सामील होईल. एलएसजी रविवारी जयपूरमध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे.बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने राहुलला स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात यष्टीरक्षण करण्याचा आणि तज्ञ फलंदाज म्हणून खेळण्याचा सल्ला दिल्याची माहिती मिळाली

## ‘रोहितचा आशीर्वाद असेल’

**मुंबई** : मुंबई इंडियन्सच्या नेतृत्वात बदल होऊन रोहित शर्माकडून हार्दिक पांड्याकडे सूत्रे गेली आहेत. रोहितचे योगदान अफलातून आहे. त्याचा हात माझ्या खांद्यावर असणारच आहेत, असे मत हार्दिक पांड्याने व्यक्त केले; परंतु नेतृत्वात बदल झाल्यानंतर आजपर्यंत त्याच्याशी संवाद झाला नसल्याचीही कबुली हार्दिकने दिली.आज पत्रकार परिषदेच्या निमित्ताने त्याला या बदलाबाबत अनेक प्रश्न विचारण्यात आले. सुवर्णमध्य साधत हार्दिकने हसत हसत उत्तरे दिली आणि कोठेही विसंवाद नसल्याचे दाखवून दिले.

# भारतीय संघ करणार ऑस्ट्रेलिया दौरा!



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारतीय क्रिकेट संघाचे वेळापत्रक यावर्षी बरेच व्यस्त आहे. या वर्षाच्या अखेरीस भारताला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरही जायचे आहे. या दौऱ्यात ५ सामन्यांची कसोटी मालिका होणार आहे. ही मालिका जागतिक कसोटी चॅम्पियनशीप २०२३-२५ स्पर्धेचा भाग आहे. दरम्यान या मालिकेतील पहिला सामना पर्थला होण्याची शक्यता आहे. पर्थव्यतिरिक्त ॲडलेड, ब्रिस्बेन, मेलबर्न आणि सिडनी या शहरात देखील या मालिकेतील सामने होणार आहेत.**

मिळालेल्या माहितीनुसार पहिला सामना पर्थला, तर दुसरा आणि तिसरा सामना अनुक्रमे ॲडलेड आणि ब्रिस्बेनला होईल. तसेच चौथा सामना बॉक्सिंग डे कसोटी सामना असेल, जो मेलबर्नला होईल, तर नवीन वर्षातील सामना अखेरचा असेल, जो सिडनीला होईल. त्याचबरोबर ॲडलेडला होणारा सामना दिवस-रात्र कसोटी साम नाही असू शकतो. दरम्यान, अद्याप क्रिकेट ऑस्ट्रेलियाने वेळापत्रक घोषित केलेले नाही, परंतु या महिन्याच्या अखेरीस या मालिकेच्या वेळापत्रकाची घोषणा होण्याची शक्यता आहे. तसेच पर्थमध्ये भारतीय संघ ६ वर्षांनी कसोटी मालिका खेळणार आहे. यापूर्वी डिसेंबर २०१८ मध्ये भारतीय संघाने पर्थमध्ये कसोटी सामना खेळला होता, ज्यात ऑस्ट्रेलियाने १४६ धावांनी विजय मिळवला होता. तसेच लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की भारतीय संघ जवळपास ३२ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियामध्ये ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. यापूर्वी १९९१-९२ मध्ये भारताने ऑस्ट्रेलियात ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळली होती. या मालिकेत ऑस्ट्रेलियाने ४-० फरकाने जिंकली होती.

### गेल्या दोन दौऱ्यात भारताचे वर्चस्व

**दरम्यान, यापूर्वी भारतीय संघाने केलेल्या शेवटच्या दोन ऑस्ट्रेलिया दौऱ्यात कसोटी मालिकेत वर्चस्व ठेवले होते. भारताने २०१८-१९ मध्ये केलेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारताने कसोटी मालिका २-१ अशा फरकाने जिंकली होती. तसेच २०२०-२१ मध्ये केलेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातही भारताने कसोटी मालिका २-१ फरकाने जिंकली.**

### पेझारी हौशी बैलगाडी मित्र मंडळ आयोजित शर्यत

# चंद्रकांत धुमाळ यांची बैलगाडी प्रथम

**। पनवेल । वार्ताहर ।**

पेझारी हौशी बैलगाडी मित्र मंडळ आयोजित भव्य दिव्य बैलगाडी शर्यत पेझारी मातीबंदर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ८० स्पर्धकांनी भाग घेतला होता.

या बैलगाडी स्पर्धेचे उद्घाटन शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, माजी जि.प.उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या बैलगाडी शर्यतीच्या अंतिम गटामध्ये पेझारी दिवलांग गावचे चंद्रकांत शंकर धुमाळ यांची बैलगाडी प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली तर द्वितीय क्रम ांक नागझरी बांधणचे महेंद्र साळवी व तृतीय क्रमांक कामार्ली वाघोलीचे ऋषिकेश नागांवकर यांनी पटकावला. या बैलगाडी शर्यतीला हजारो प्रेक्षकांनी उपस्थित लावली होती.



# श्रीलंका-बांगलादेश सामन्यात ४ खेळाडू जखमी

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

श्रीलंकेचा संघ सध्या बांगलादेशच्या दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली जात आहे. आश्चर्यकारक बाब म्हणजे या सामन्यात चार खेळाडू जखमी झाले आहे. यातील दोन खेळाडूंना स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर काढावे लागले. तर एकाची दुखापतीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यालाही थेट रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.



बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला दुखापत झाली. मुस्तफिजुर रहमानला क्रॅम्पमुळे मैदान सोडावे लागले. श्रीलंकेच्या डावात ४२व्या षटकातील शेवटचा चेंडू टाकताना तो मैदानावर पडला. यावेळी तो काहीशा अडचणीत दिसत होता. असे असूनही त्याने ४८व्या डावात पुन्हा गोलंदाजी केली आणि पहिल्याच चेंडूवर तो पुन्हा मैदानावर पडला. त्यानंतर वैद्यकीय पथक मैदानावर आले आणि त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर काढले.

यासोबत बांगलादेशचा यष्टिरक्षक जाकर अली याला गंभीर दुखापत झाली आहे. क्षेत्ररक्षण करताना त्याला ही दुखापत झाली. झेल घेण्याच्या प्रयत्नात तो त्याचा सहकारी खेळाडू अनामुल हकशीला जाऊन धडकला. त्यामुळे तो जखमी झाला. यानंतर जाकर अलीलाही स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर काढण्यात आले. त्याची दुखापत पाहून त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले.

या सामन्यात मुस्तफिजुर रहमान आणि जाकेर अली यांच्याशिवाय आणखी दोन खेळाडू जखमी झाले. हे दोन्ही खेळाडू बांगलादेशचे आहेत. खरंतर, जाकर अलीशी टक्कर दिल्यानंतर अनामूल हकही जखमी झाला होता. त्याची दुखापत गंभीर नव्हती.याशिवायसौम्यासरकारलाही क्षेत्ररक्षण करताना दुखापत झाली. सौम्या सरकारही दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर आहे. या साम न्यात श्रीलंकेने बांगलादेशविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना २३५ धावा केल्या. बांगलादेशकडून तस्किन अहमदने ३ बळी घेतले. बांगलादेशने मालिकेतील पहिला सामना जिंकला. तर श्रीलंकेने दुसरी वनडे जिंकली होती.

# अखिल शेरॉन, अनिश भानवाला यांना नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिंपिक कोटा मिळवणारे नेमबाज अखिल शेरॉन आणि अनिश भानवाला यांनी पॉलिश ग्रांड प्रिक्स चॅम्पियन्स स्पर्धेत सुवर्णपदकांची कमाई केली. शेरॉनने पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन या प्रकारात ४६८.४ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. पॅट्रिक जेनी या झेकोस्लावाकिया खेळाडूपेक्षा शेरॉनने .२.२ गुणांची अधिक कमाई केली.भानवाला याने जोसेफ झापेजस्की ग्रांप्रि स्पर्धेत २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकले. शेरॉन आणि भानवाला या दोघांच्या या स्पर्धा एका वेळी झाल्या.



भारताचे ५० मीटर आणि २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारातील काही खेळाडू युरोपमध्ये विविध स्पर्धांत अनुभासाठी सहभागी झा ले आहेत. पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर हा सराव महत्त्वाचा आहे. नौदलाचा नेमबाज निरज कुमार यानेही रायफल थ्री पोझिशन प्रकारात दोन कांस्यपदके मिळवून प्रभाव पाडला. या स्पर्धेत दोन पदके मिळवणारा तो एकमेव भारतीय ठरला. प्राथमिक फेरीत निरजने ५९५ आणि ५९४ अशी कामगिरी केली.

पहिल्या फेरीत तो रिओ ऑलिंपिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या सेर्थी कुलिशनंतर निरजने दुसरा क्रमांक मिळवला होता. या प्रकारात महाराष्ट्राच्या स्वप्नील कुसाळे याने प्राथमिक फेरीत ५९५ गुणांची कमाई केल, परंतु त्याला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. पॅरिस ऑलिंपिकचा कोटा मिळवणाऱ्या श्रीयांका सदांगी आणि अशी चोक्षी यांनी महिलांच्या थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदके मिळवली. हे भारतीय नेमबाज आज ड्रॉटमंड येथील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जर्मनीला रवाना होणार आहेत.

## जयदेव उनाडकट खेळणार कौंटी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघातून खेळण्याचे प्रत्येकाचे स्वप्न असते. पण फार कमी खेळाडूंना भारतीय संघाकडून खेळण्याची संधी मिळते. जयदेव उनाडकटने जुलै २०२३ मध्ये भारतीय संघासाठी शेवटचा कसोटी सामना खेळला होता. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत त्याला संधी मिळालेली नाही. आता त्यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे.जयदेव उनाडकट यंदाच्या कौंटी चॅम्पियनशिपमध्ये इंग्लंडच्या क्लब ससेक्सकडून शेवटचे पाच सामने खेळणार आहे. तो इंग्लिश भूमीवर खेळताना दिसणार आहे.

गेल्या मोसमात, उनाडकटने लीसेस्टरशायरविरुद्ध दुसऱ्या डावात ६ बळी घेत आपल्या संघाला १५ धावांनी विजय मि ळवून दिला होता. उनाडकट कौंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळण्यापूर्वी तो इंडियन प्रीमियर लीगमध्ये सनरायझर्स हैदराबादकडून खेळणार आहे. जयदेव उनाडकटने २०१० मध्ये भारतीय संघाकडून कसोटी पदार्पण केले. त्याने भारतीय संघासाठी आतापर्यंत ४ कसोटी सामन्यांमध्ये ३ बळी घेतले आहेत. त्याने ८ एकदिवसीय सामन्यांमध्ये ९ बळी आणि १० टी २० सामन्यात १४ बळी घेतले आहेत.

### पाकिस्तान सुपर लीग स्पर्धा

# इस्लामाबाद युनायटेड विजयी

**। कराची । वृत्तसंस्था ।**

सोमवारी कराची येथे खेळल्या गेलेल्या पाकिस्तान सुपर लीगच्या अंतिम सामन्यात इस्लामाबाद युनायटेडने मुलतान सुलतान्सचा २ गडी राखून पराभव करून विजेतेपद पटकावले. यासह इस्लामाबाद युनायटेड तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावणारा संघ बनला आहे.

इमाद वसीम आणि मार्टिन गप्टिल हे इस्लामाबाद युनायटेडच्या विजयाचे हिरो ठरले. वसीमच्या ५ बळींमुळे इस्लामाबादने मुलतानला निर्धारित २० षटकांत ९ बळींवर १५९ धावांवर रोखले. तर मार्टिन गप्टिलच्या अर्धशतकाच्या जोरावर इस्लाम ाबादने शेवटच्या चेंडूवर दोन गडी राखून लक्ष्य गाठले. इस्लामाबाद युनायटेड हा तीन वेळा विजेतेपद पटकावणारा पहिला संघ ठरला आहे. १६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इस्लामाबादने शेवटच्या चेंडूवर विजय मिळवला. यापूर्वी २०१६ आणि २०१८ मध्ये इस्लामाबादने विजेतेपद पटकावले होते. ६ वर्षांनंतर पुन्हा एकदा इस्लामाबादने ट्रॉफी आपल्या नावे केली. इस्लामाबादशिवाय लाहोर कलंदर संघाने दोनदा विजेतेपद पटकावले आहे. त्याच वेळी २०२१ मध्ये प्रथमच पीएसएलचे विजेतेपद जिंकल्यानंतर, मुलतान सुलतान्सला २०२२, २०२३ आणि आता २०२४ मध्ये सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

### इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनने कुस्ती महासंघाची

# ॲड हॉक समिती केली विसर्जित

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने भारतीय कुस्ती महासंघाबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी भारतीय कुस्ती महासंघाचा कारभार पाहणारी तदर्थ समिती विसर्जित केली आहे. काही दिवसांपूर्वी केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघाची नवीन कार्यकारणी बरखास्त केली होती. त्यानंतर तदर्थ समिती स्थापन केली होती.

या महिन्यात युनायटेड वर्ल्ड रेसलिंगने भारतीय कुस्ती महासंघाची सदस्यता बहाल केली होती. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदाची निवडणूक वेळेत न झाल्याने सदस्यता रद्द केली होती. मात्र त्यानंतर झालेल्या बैठकीत युनायटेड वर्ल्ड रेसलिंगने काही अटी शर्तींसह भारतीय कुस्ती महासंघाची सदस्यता पुन्हा बहाल करण्याचा निर्णय घेतला.

### विनेश, बजरंग आणि साक्षीने केला होता विरोध

**विनेश फोगाट, बजरंग पुनिया आणि साक्षी मलिक सारख्या स्टार कुस्तीपटूंनी माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्याविरूद्ध लैंगिक अत्याचाराचा आरोप केला होता. त्यानंतर त्यांनी बृजभूषण यांच्याविरूद्ध प्रदर्शन केले होते. त्यांनी बृजभूषण यांना पदावरून हटवण्याची मागणी केली होती.**

## भारतीय फलंदाजांचा झाला केंद्रीय करार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत पदार्पणातच चमकदार कामगिरी करणाऱ्या सर्फराज खान आणि ध्रुव जुरेल यांना बीसीसीआयने मोठी भेट दिली आहे. या दोन्ही फलंदाजांचा केंद्रीय करार मिळालेल्या खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.



सोमवारी बीसीसीआयच्या सर्वोच्च परिषदेची बैठक पार पडली ज्यामध्ये सर्फराज खान आणि ध्रुव जुरेल यांना केंद्रीय करारामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्फराज आणि यष्टिरक्षक फलंदाज ध्रुव जुरेल यांना बीसीसीआयच्या केंद्रीय कराराच्या श्रेणी सी मध्ये स्थान मिळाले आहे आणि त्यांचे वार्षिक रिटेनरशिप फी १ कोटी रुपये असेल.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या केंद्रीय करारामध्ये इशान किशन आणि श्रेयस अय्यर यांना स्थान न मिळाल्याने बराच गदारोळ झाला होता. रणजी ट्रॉफीमध्ये न खेळल्यामुळे बीसीसीआयने या दोन अनुभवी खेळाडूंना केंद्रीय करारातून वगळले होते.मात्र, नंतर श्रेयस रणजी करंडक स्पर्धेत मुंबईकडून खेळला. दरम्यान, बोर्डाने सोमवारी महत्त्वपूर्ण निर्णय घेत दोन युवा फलंदाजांचा केंद्रीय करारात समावेश केला आहे.

इंग्लंडविरुद्ध नुकत्याच संपलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेदरम्यान सर्फराज आणि जुरेल यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

# फ्लॉइड मेवेदर सिद्धिविनायकाचरणी

***। मुंबई । वृत्तसंस्था ।***

***जग जिंकणाऱ्या बॉक्सरपैकी एक फ्लॉइड मेवेदर ज्युनियर सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे. यादरम्यान तो मंगळवारी मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरात जाऊन गणपती बाप्पासमोर नतमस्तक झाला. एवढेच नाही तर त्याने तेथे बाप्पाला फळे आणि शालही अर्पण केली. यानंतर पंडितांनी त्याला प्रसादाची टोपली दिली आणि गळ्यात शालही गुंडाळली. मेवेदरने गणपती बाप्पाच्या दरबारात डोके टेकवून दर्शन घेतले.***



*मेवेदर जगातील सर्वात श्रीमंत बॉक्सरपैकी एक आहे. त्याने १५ पेक्षा जास्त मोठ्या जागतिक स्पर्धा जिंकल्या आहेत. यावेळी सिद्धिविनायक मंदिरातील त्याचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मेवेदर भारतात येण्यासाठी खूप उत्साहित आहे आणि त्याने सोमवारी सांगितले होते की, मला यावर्षी भारतात सामने खेळायचे आहे. मेवेदरने बॉक्सिंगमध्ये भारतात आणि परदेशात अनेक विक्रम केले आहेत.मूळचा अमेरिकेचा असलेल्या मेवेदरकडे १५ वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि लीनल चॅम्पियनशिप विजेतेपद आहेत. तो २०१७ मध्ये निवृत्त झाला आणि त्यानंतर त्याने अनेक प्रदर्शनीय सामने खेळले. १९९६ च्या ऑलिम्पिकमध्ये त्याने फेदरवेट प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. त्याने तीन वेळा (लाइट फ्लायवेट, फ्लायवेट आणि फेदरवेट) यूएस गोल्डन ग्लोव्हज खिताब जिंकले आहेत.*

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)